CMYK

# विकसनशील सोलापूर

सोलापूर तरुण भारत

सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५

वर्धापनदिन विशेष

पान १




# ध्येयाचा ध्यास लागला की कामाचा त्रास वाटत नाही



**सोलापूरचे जिल्हाधिकारी म्हणून कुमार आशीर्वाद २ वर्षांपूर्वी रूजू झाले आणि त्याच काळात मलाही दैनिक तरूण भारत परिवाराकडून राजकीय तसेच जिल्हाधिकारी बीटची जबाबदारी मिळाली. सुरूवातीला जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा स्वभाव तसा कडकच वाटला. मात्र वारंवार भेटी होत गेल्या आणि जाणवलं की, जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचा स्वभाव फणसासारखा वरून कडक आणि आतून गोड असल्याचं जाणवलं...त्यांच्या वारंवार होणाऱ्या कार्यालयीन बैठका, विभागीय स्तर आणि राज्यस्तरावरील होणाऱ्या 'व्हिसी', मंत्र्यांच्या विशेष बैठका पाहून अशा अधिकाऱ्यांवरील कामाचे बर्डन दिसून आले. तरीही जिल्ह्यातील कोणताही मोठा कार्यक्रम, उत्सव आणि निवडणुकांच्या उत्सवात जिल्हाधिकारी अत्यंत मन लावून काम करताना दिसून आले. त्यांना एवढं कसं जमतं हो...असं विचारल्यावर त्यांनी सांगितलं की, "When one is driven by a goal, the hardship of work doesn't bother." (ध्येयाचा ध्यास लागला की कामाचा त्रास वाटत नाही)**



अविनाश गायकवाड

वरिष्ठ उपसंपादक

९४२१८७६३४०

खरंच, त्यांच हे वाक्य ऐकून अंत्यंत समाधान वाटले. जिल्हाधिकारी कक्षातील कोणतीही गोष्ट असो...ती लहान असो वा मोठी...प्रत्येक गोष्टीचे जिल्हाधिकाऱ्यांकडून मायक्रोप्लॅनिंग (सुक्ष्म नियोजन) होते, हे या यांच्या कामाच्या पध्दतीतून दिसून आले. परवाच पंढरपूर येथे आषाढी वारी सोहळा पार पडला. या वारीत तब्बल २७ लाख भाविकांची गर्दी एकदाच पंढरीत आली होती. जिल्हा प्रशासनालाही एवढी गर्दी होईल, असे वाटले नव्हते. त्यांनी अवघ्या २२ लाख भाविकांच्या गर्दीचे नियोजन आखले होते. तरीही आहे त्या कर्मचाऱ्यांवर त्यांनी यंदाची आषाढी वारी सक्सेस करून दाखविलीच. या वारी काळात जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता वारकऱ्यांसाठी दिवसरात्र जागरण केलं...ऐन एकादशी दिवशी भाविकांची तोबा गर्दी असल्याने स्वत: दुचाकीवरून फिरून त्यांनी नियोजन लावले. जुलैमध्ये पाऊस पडण्याची भीती असल्याने वारकऱ्यांसाठी शासनस्तरावरून विविध उपाययोजना केल्या होत्या. इतकेच नाहीतर उजनीच्या पाण्याचेही योग्य नियोजन लावले होते. पंढरी नगरीतील श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिराचे सर्व विश्वस्त, दिंडीप्रमुख, पत्रकार बांधव आणि प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांनीही त्यांना सहकार्य केले. यंदा जर्मन हँगर, वॉटरप्रुफ मंडप उभारणी, विविध ठिकाणी केलेले मुरमीकरण, खडीकरण अन् वारकऱ्यांच्या आरोग्याबाबत घेतलेल्या दक्षतेमुळे एकाही वारकऱ्यांची कसलीही तक्रार आमच्याकडे आली नाही, असा दावाही त्यांनी केला. यामुळे यंदा अत्यंत उत्साही, सुंदर आणि विर्विघ्नपणे आषाढी वारी सोहळा पार पाडल्याचे समाधान जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केले. या वारीच्या कामाची दखल पावसाळी अधिवेशन काळातही लोकप्रतिनिधींनी घेतली. इतकेच नाहीतर विभागीय आयुक्त, खुद्द मुख्यमंत्र्यांनीही आशीर्वाद यांच्या कामाचे कौतुक केले होते.

**विशेष मुलाखत**

त्यांचे जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेसाठीही वर्षभर असेच काम चालू असते. शासनाकडून आलेल्या प्रत्येक योजनेचा स्वत: व्यवस्थित अभ्यास करणे...सहकार्यांना याची माहिती बैठकांद्वारे देणे आणि सर्वसामान्य लाभार्थ्यांना त्या योजनेचा फायदा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची सतत धडपड दिसते. सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात जिल्हा नियोजन समितीची भूमिकाही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. नियोजन समिती मार्फत प्रत्येक वर्षी जिल्ह्यातील विविध शासकीय यंत्रणांना विविध शासकीय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ७०० ते ९०० कोटीचा निधी देण्यात येतो. प्रत्यक्ष शासकीय विभागाकडून या प्राप्त झालेल्या निधीतून विकासात्मक कामे करण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळवून दिला जातो. पालकमंत्री जयकुमार गोरे हे समितीचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे समिती सचिव म्हणून नियोजनबद्ध विकास कार्यक्रम राबवून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र राबताना दिसतात.

## जिल्ह्यात एकाच वर्षात ६२ हजार घरकुले मंजूर



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सर्वांसाठी घर हे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याला २० लाख घरकुलाचे उद्दिष्ट प्राप्त करून घेतले आहे. सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ मध्ये मागील सात वर्षात ४३ हजार ९९० घरकुले मंजूर होती त्यापैकी ४० हजार १९० घरकुले पूर्ण झालेले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा- २ सुरू झालेला असून चालू एकाच आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजनेतून ६२ हजार ९५० घरकुले मंजूर केलेली आहेत. साहित्याच्या वाढत्या किमतीमुळे घरकुल लाभार्थ्यांना निधीची कमतरता भासत होती अशा वेळेस मुख्यमंत्री महोदयांच्या प्रयत्नाने घरकुल लाभार्थ्यांना राज्य हिस्स्यामधून ५० हजार रुपयांची अतिरिक्त वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ३५ हजार रुपये घरकुल बांधकामासाठी व १५ हजार रुपये प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसाठी अशी तरतूद करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील बेघर लाभार्थ्यांच्या आवास प्लस २०२४ चे सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. यास्तव ग्राम पातळीवर आवश्यक ती प्रचार प्रसिद्धी करून जिल्ह्यातील एकही बेघर लाभार्थी सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता जिल्हा प्रशासनाकडून घेतली जात आहे.

## जिल्हा प्रशासनाच्या वतीने भूमिहीन नागरिकांना जमीन वाटप



प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्रामीण भागातील भूमिहीन नागरिकांना एक रुपये प्रति चौरस फुट दराने जागा देण्यात येणार असून, २५ मे २०२५ पासून ग्राम पंचायतीच्या वतीने जमीन वाटपाची प्रक्रिया सुरू झाली आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सुमारे दोन हजार भूमिहीनांना घरासाठी जमीन उपलब्ध होणार आहे. तत्पूर्वीच जिल्हा प्रशासनाने शासकीय जमीन, अतिक्रमण झालेली जमीन व गायरान जमीन आदींची यादी बनवून लॅन्ड बँक तयार केलेली आहे.



## विमानसेवा

नूतनीकरण झालेल्या सोलापूर विमानतळाचे म ाहे नोव्हेंबर २०२४ रोजी देशाचे माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी दिल्ली येथून दूरदृश्य प्रणाली द्वारे लोकार्पण झाले. सोलापूर जिल्हा विमान वाहतुकीने जोडला गेल्यामुळे येथील उद्योग व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. त्यामुळे राज्य शासन व विमानतळ प्राधिकरण सोलापूर विमानतळ येथून विमान सेवा सुरू झाली आहे. सध्या सोलापूर ते गोवा विमानसेवा चालू असून, ऑगस्टपासून सोलापूर-मुंबई विमानसेवा चालू होणार आहे.

## जिल्ह्यात १०० दिवसाच्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी

मुख्यमंत्री महोदयांच्या सूचनेप्रमाणे १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत जिल्हा प्रशासनाने सात कलमी कार्यक्रम ाची अंमलबजावणी केलेली आहे. या आराखड्याचा दुसरा टप्पा अंतर्गत सर्व प्रशासकीय यंत्रणांनी केलेल्या कामाची त्रयस्थ संस्थेकडून तपासणी लवकरच सुरू होत आहे. परंतु प्रशासनाने शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतरही याच पद्धतीने लोकांना उत्कृष्टपणे सेवा दिल्या गेल्या पाहिजेत.

## यावर्षी जिल्ह्याला ९३४ कोटींचा निधी मंजूर



जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७०२ कोटी निधी मंजूर होता. या सर्व निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे घेण्यात आलेली असून जवळपास ९९.७४ टक्के निधी खर्च झाला आहे. तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५ - २६ अंतर्गत सोलापूर जिल्ह्याला ९३४ कोटी २८ लाखाचा निधी मंजूर आहे. यातून ही सर्व शासकीय यंत्रणांना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची कामे प्रस्तावित करणार आहेत.

## खरीप हंगामाची नुकसान भरपाई मिळाली २१६ कोटी

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२३ मधील ३ लाख ८५ हजार शेतकऱ्यांना २१६ कोटी तसेच रब्बी हंगाम २०२३ मधील ४० हजार शेतकऱ्यांना २२ कोटी पिक विमा नुकसान भरपाई निधी वितरित करण्यात आलेला आहे. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत फळ उत्पादनात सोलापूर जिल्ह्याचे काम चांगले असून आपला जिल्हा केळी निर्यातीत प्रथम क्रमांकावर असून लवकरच उत्पादनातही आघाडी घेईल.

## लखपती दीदी योजनेत ४७३ कोटीचे कर्ज वितरण



लखपती दीदी योजनेत सोलापूर जिल्ह्याला १ लाख १९ हजाराचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते, त्यानुसार १ लाख २५ हजार लखपती दिदी जिल्ह्यात झालेल्या असून उद्दिष्टापेक्षा अधिक काम झालेले आहे. या महिलांना लखपती करण्यासाठी ४५३ कोटी रुपयांचे बँक कर्ज वितरित करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर शहरात मध्यवर्ती ठिकाणी उमेद मॉल उभारण्यात येणार आहे, त्यासाठी राज्य शासनाने २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली आहे.

## महिला बचत गटांना मिळाली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ



उमेद अंतर्गत पंढरपूर येथील शिवस्वराज्य महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या महिला शेतकरी सदस्यांनी पिकवलेला २ टन शेवगा दुबई येथे निर्यात केला तर माढा येथील माढेश्वरी महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या महिला शेतकऱ्यांनी ९ टन पेरू सौदी अरेबिया येथे निर्यात केला. स्थानिक बाजारपेठेपेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या महिला सदस्यांच्या शेतमालाला दुप्पट बाजार भाव मिळाला आहे.



## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील ८०० ज्येष्ठ नागरिकांचे ११ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ओरिसा येथील श्री जगन्नाथ पुरीचे दर्शन घडवून आणलेले आहे.

## भू-प्रणाम केंद्र ही सुविधा सुरू



भूमि अभिलेख विभागाकडून नागरिकांच्या सोयी करीता सोलापूर येथे नगर भूमापन अधिकारी कार्यालय येथे भू प्रणाम केंद्र ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. सेतु सुविधा केंद्राच्या धर्तीवर ही सुविधा देण्यात येत आहे. तरी नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.

## जिल्ह्यातील गरजू रुग्णांना आरोग्य योजनाचा लाभ

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत जिल्ह्यात ११ लाख ५२ हजार गोल्डन कार्ड तयार करण्यात आली आहेत. या लाभार्थ्यांना प्रतिवर्षी प्रति कुटुंब ५ लाख रुपये पर्यंतचे विमा कवच उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. या योजनेचे जिल्ह्यात ८६ तर जिल्हा बाहेरील अंगीकृत रुग्णालयामध्ये आरोग्य सेवा दिली जात आहे.

## जलयुक्त शिवार अभियान २.०

या अंतर्गत जिल्ह्यातील १६५ गावांची निवड करण्यात आलेली आहे. या सर्व गावामध्ये विविध यंत्रणांकडून जलसंधारणाची कामे प्रस्तावित करून ही गावे जलयुक्त केली जाणार आहेत. या गावातील ३ हजार ५७२ कामांसाठी ९५ कोटी १४ लाखाचा निधी मंजूर करण्यात आलेला असून शासनाकडून ८.५० कोटी निधी प्राप्त झालेला आहे. तर या अभियान अंतर्गत मार्च २०२५ अखेर ९ कोटी ९६ लाखाची १११ पूर्ण केली जाणार आहेत.



## गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार

या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ व २४-२५ मध्ये एकूण १२५ जलसाठ्या मधून ८७.३५ लाख घनमीटर इतका गाळ काढून अडीच हजार हेक्टर क्षेत्रावर शेतकऱ्यांनी टाकला आहे. गाळ काढल्यामुळे साधारणतः ८७३.५० कोटी लिटर इतका पाणीसाठा वाढलेला आहे. शेतात गाळ टाकल्याने व सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात भरघोस वाढ होऊन या योजनेचा लाभ त्यांना मिळत असल्याने शेतकरी बांधव ही समाधानी आहेत.


## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ




या महामंडळाच्या माध्यमातून राज्यभरात एक लाख मराठा उद्योजक बनवण्याचे संकल्प पूर्ती झालेली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ११ हजार ९०० लाभार्थ्यांचा समावेश आहे. हे महामंडळ मराठा तरुणांना उद्योग व्यवसाय विषयी मार्गदर्शन करून स्वतः च्या उद्योग उभा करण्यासाठी बँकांच्या माध्यमातून कर्ज उभारणी व त्यावरील व्याजाचा परतावा देते. आज रोजी पर्यंत जिल्ह्यातील लाभार्थ्यांना ९१ कोटीचा व्याज परतावा महामंडळाकडून देण्यात आलेला आहे. तसेच महामंडळ जिल्ह्यातील जास्तीत जास्त मराठा तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी कटीबद्ध आहे.

## एकात्मिक पर्यटन विकास आराखडा

सोलापूर जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा जिल्हा आहे. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर पर्यटन पूरक उद्योग वाढवून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती शक्य आहे. यामुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला वेग येईल, तसेच येथून होणारे स्थलांतर ही थांबण्यास मदत होणार आहे. राज्य शासनाने सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यासाठी एकूण २८२.७५ कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. या अंतर्गत उजनी जल पर्यटन १९० कोटी १९ लाख, कृषी पर्यटन १९ कोटी ३० लाख, विनयार्ड पर्यटन ४८ कोटी २६ लाख, धार्मिक पर्यटन २५ कोटी निधी मंजूर आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला खूप मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे.



## पंढरपूर विकास आराखडा



श्री क्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मि णी च्या दर्शनासाठी लाखो भाविक दरवर्षी येत असतात. परंतु भाविकांना दर्शनासाठी खूप वेळ दर्शन रांगेत उभे राहावे लागते त्यामुळे दर्शन मंडप व दर्शन रांग याकरिता १२९.४० कोटीचा आराखडा शासनाने मंजूर केला असून ही कामे लवकरच सुरू होणार आहेत. पंढरपूर देवस्थान मंदिर विकासाकरिता ७३.८५ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आलेला असून या अंतर्गत ५५.४६ कोटीच्या रकमेची तीन कामांना प्रशासकीय मान्यता मि ळाली असून यावर जवळपास १५ कोटीचा निधी खर्च झालेला आहे उर्वरित सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. दर्शन मंडप, दर्शन रांग व मंदिरातील अन्य कामे वेळेत पूर्ण करून भाविकांना सहज व सुलभ दर्शन मिळणार आहे.











# सोलापूरच्या विकासासाठी स्थानिकांच्या महत्त्वाकांक्षेची गरज




दीपक कलढोणे

सोलापूर

९८२२०१३५८२


**उत्तमतेची उच्चतम अशी निश्चित मर्यादा नसते. ते सतत उंचावणारे क्षितिज असते. कांहीं चांगले करायचे म्हटले तर याहून चांगले, अधिकाधिक चांगले, सर्वात चांगले.. असाच सारा प्रवास असतो. पूर्वी जसे सोलापूर उत्तम होते, त्याहून आता आणखी उत्तमच आहे; यात संदेह नाही ; परंतु विकासाचा, प्रगतीचा हा प्रवास, येथील प्रत्येकाला आपला वाटायला हवा, सतत पुढे आणि पुढेच जायला हवा. सोलापूरच्या विकासाच्या दूरदृष्टीचे भान ठेवून हा प्रगतीचा प्रवास अधिकाधिक सजग आणि गतीशील व्हायला हवा. कोणतीही शहरे विकसित होत असताना जुन्या-नव्या समस्या सोबतीला घेऊनच विकसित होत असतात. समस्या नाहीत, असं कोणत्याही जीवाचं जीवन नाही आणि समस्या नाहीत, असं कोणतं गावही नाही. आपलं सोलापूर याला अपवाद कसं असेल? येथे अनेक चांगल्या गोष्टी आहेत आणि त्यात आणखी सुधारणाही करायला हव्यात.**



प्रत्येक शहरांमध्ये, साधारणतः कचरा विल्हेवाट नियोजन, आरोग्य सुविधा, हवा-पाणी प्रदूषण, पर्यावरणविषयक कमी जागरूकता, बेरोजगारी, पाणीटंचाई, सार्वजनिक वाहतूक, उद्योगविश्व, उद्योगवाढीसाठी सर्वच प्रकारच्या वाहतुकीची सुविधा, उद्योगपतींना असणाऱ्या वेळेच्या अडचणी दूर होण्यासाठी त्यांना येण्या-जाण्यासाठी पूरक ठरेल अशी सोयीची हवाई वाहतूक, नागरिकांमध्ये असलेला स्वयंशिस्तीचा अभाव अशा समस्या आपल्या येथे आहेतच. आपले शहर सुंदर असावे, या शहर संस्कृतीच्या मानसिकतेमध्ये येथील काही लोकांमध्ये असलेली सकारात्मक तळमळ आणि कांहीं लोकांमध्ये असलेली याबाबतची नकारात्मक बेफिकिरी यातील तफावत यामुळे सोलापूरमध्ये प्रगती होत असली तरी प्रगतीमधील गती मात्र हवी तशी दिसून येत नाही.

'सोलापूर हे एक मोठे खेडे आहे,' अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. ही प्रतिमा भविष्यकाळात बदलण्यासाठी सोलापूरच्या विकासात स्थानिकांची महत्त्वाकांक्षा शतपटीने वाढणे आवश्यक आहे.

बहुभाषिक आणि बहुधर्मी शहर म्हणून सोलापूरची वेगळी खासियत असली तरी हे शहर आपले आहे आणि आपणच ते स्वच्छ ठेवले पाहिजे, या शहराचा विकास झाला पाहिजे ही मानसिक तळमळ अजून हवी तशी निर्माण होत नाही, ही एक वेगळी मानसिक समस्या सोलापूरबाबत आहेच. कचरा व्यवस्थापनाबाबत म हापालिकेच्या घंटागाड्या बऱ्याचश्या नियमितपणे शहरातील सर्व भागांमध्ये फिरत असतात, तरीही सोलापुरात कोणत्याही भागात गेले असता रस्त्यावर कचरा पडलेला आढळून येतो. महानगरपालिकेच्या घंटागाड्या निश्चित व नागरिकांच्या सोयीच्या सकाळच्या वेळेमध्ये येण्याचे प्रमाण अजूनही सुधारायला हवे. त्यामुळे पुष्कळदा परिसरातील रिकामी जागा घरातील कचरा बाहेर टाकण्यासाठी वापरली जाते. वाऱ्यामुळे हा कचरा उडून पुन्हा रस्त्यावर येतो आणि शहराचे एक अमंगल दृश्य पाहायला मिळते. याबाबत महानगरपालिकेचे प्रयत्न स्तुत्यच आहेत परंतु नागरिकांमध्ये मात्र हवी तशी जागरूकता दिसत नाही. बऱ्याच ठिकाणी रस्त्याच्या दुभाजकांमध्ये लावलेली शोभेची झाडे जपली जात नाहीत आणि त्या दुभाजकांमधील झाडांसाठी केलेला मातीचा हौद कचऱ्यासाठी उकिरडा म्हणून वापरण्यात येत असलेले दिसते. याबाबत स्वच्छ भारत का इरादा कर लिया हमने ! हे गाणे फक्त कर्णकर्कश आवाजापुरते मर्यादित राहत आहे. कचऱ्याचे प्रदूषण हटवता हटवता ध्वनीप्रदूषण मात्र वाढत आहे. खरे तर प्रभाती रामनाम चिंतित जावे या संस्कृतीप्रमाणे सकाळची वेळ ही मनास म ंगल्य देण्याची असते. परंतु कचऱ्याच्या घंटागाड्यावर घंटाच नाही. कचरा गाड्यावर लावलेल्या भोंग्यातून जागरूकता गीताचा किती मोठा आवाज असावा ? याबाबत घंटागाडी चालक बेफिकीर आढळून येतात. खरे तर घंटागाडी हे नाव मोठ्या विचारपूर्वक दिलेले असते. या गाड्यांवर घंटेचाच आवाज लावता आला तर अधिक चांगले आणि मंगल वाटेल. घंटेच्या आवाजामुळे प्रत्येक सकाळ प्रफुल्लित होऊन जाईल. सोलापूर हे एक गाव नसून मंदिर आहे अशी ही भावना निर्माण होण्यास म दत होईल. याबाबत महानगरपालिकेने संस्कृती संवर्धनात्मक विचार करायलाही काही हरकत नाही.

आरोग्य सुविधांबाबत आपले सोलापूर बरेचसे प्रगत आहे. सर्वोपचार रुग्णालयातील अस्वच्छता या नागरिकांनीच निर्माण केलेल्या समस्येबाबत इस्पितळ व्यवस्थापन बऱ्याचदा हताश होते. सोलापुरात खाजगी रुग्णालयांची संख्या आणि सुविधा आरोग्याबाबत पोषक आहेत. आपल्याकडे हवा प्रदूषणापेक्षा धूळप्रदूषण अधिक आढळते. यासाठी अधिकाधिक संख्येने वृक्षलागवड व संवर्धन व्हायला हवे. पर्यावरण विषयक जाणीव निर्माण होण्यासाठी सोलापुरात जागेची उपलब्धता पाहून त्या त्या ठिकाणी योग्य होतील; असे वृक्षसंवर्धन गरजेचे आहे.

ध्वनी प्रदूषणाबाबतही जागरूकता होणे गरजेचे आहे. खाजगी विवाह समारंभ अथवा महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथीनिमित्ताने होणाऱ्या मिरवणुका दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहेत. अशा अतिभव्य मिरवणुकातून प्रत्येक सम ाजाचे सामाजिक ऐक्य निर्माण होत असले तरी या मिरवणुकांची खरोखरच इतकी मोठी गरज आहे का? या मिरवणुकांसाठी होणारा लाखो रुपयांचा खर्च सामाजिक प्रगतीसाठी स्वावलंबी विकास योजना करण्यासाठी वळवता येणार नाही का ? याशिवाय या मिरवणुका पार पडल्यानंतर दुसरे दिवशी परिसर स्वच्छतेचा महानगरपालिकेवर किती ताण निर्माण होतो ? याचाही विधायक व सकारात्मक विचार आता सामान्य नागरिकांनीच करायला हवा.

सोलापूरला पाणीटंचाई आहे, हे विधान खोटे वाटावे, इतके पाणी लोक वाया घालवत असतात. काही भागातून जाताना तर 'आज नळाला पाणी आले आहे' हे वेगळे सांगण्याची गरज भासत नाही. वाहनांइतकेच पाणीही रस्त्यावर सुसाट धावत असते. वास्तविक दुष्काळी प्रदेशात आपण राहत असताना सव्वाशे किलोमीटर अंतरावरून पाईपलाईनने आणलेले महागडे पाणी आपण इतके का उधळत आहोत ? याचा विचार नागरिकांनीच करण्याची गरज आहे. यासाठी जलपुनर्भरण, जलसंवर्धन, विधायक जलवापर यासाठी साक्षरता व जागरूकता निर्माण होणे गरजेची आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबाबत सोलापूरला कधी जाग येणार ? हा खूप मोठा प्रश्न आहे. एवढ्या मोठ्या शहरात सार्वजनिक वाहतूक बसेसची सुविधा नाही, ही गोष्ट खरोखरच लाजिरवाणी वाटते. प्रायोगिक तत्त्वावर २५ ते ३५ आसनी बसेस सोलापूरला चालवून पाहायला हव्यात. तरुणांमध्ये असलेली बेरोजगारी ही सोलापुरातील सर्वात म हत्त्वाची समस्या आहे. लौकिक अर्थाने आणि व्यावसायिक शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरुणांना सोलापुरात रोजगाराच्या, नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध नाहीत. विशेषत्वाने सोलापूर जिल्ह्यातून दर वर्षी साधारणतः विविध शाखांचे पाच हजार अभियंते बाहेर पडतात, या सर्व तरुणांना नोकरी मिळेल; अशा उद्योगविश्वाची विस्तारपूर्वक उभारणी सोलापुरात खूपच गरजेची आहे. येथे येऊन विविध कंपन्यानी गुंतवणूक करण्याची गरज आहे. सोलापुरला यायला रस्त्यांची आणि रेल्वेची उत्तम सुविधा झाली असली तरी उद्योगपतींना येण्या-जाण्यासाठी सोईस्कर हवाई वाहतूक सेवा निर्माण होण्याची खरोखरच गरज आहे. सोयीस्कर विमानसेवा नसल्याने उद्योगपती येथे येऊन काही धाडस करण्यास धजावत नाहीत. त्यामुळे नवीन कंपन्या येथे येत नाहीत. येथे आय.टी. उद्योग आणि इतर उद्योगविश्वातील कंपन्या मोठ्या संख्येने आल्यास येथील तरुण येथेच राहतील. शेतीप्रधान जिल्हा म्हणून शेतीपूरक आणि शेतीमालावर प्रक्रिया उद्योगसुद्धा मोठ्या प्रमाणात येथे उभारले पाहिजेत. या गोष्टींमुळे तरुणांना सोलापुरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन आर्थिक सुबत्तेबाबतही सोलापूरचा व्यापार वाढण्यास आणखी मदत होईल. उद्योगविश्वाची कमतरता असल्याने सोलापुरातील बहुसंख्य कुटुंबातील तरुण पुणे, मुंबई, बेंगलोरकडे किंवा इतर महानगरांकडे जात आहेत आणि सोलापूर हे पेन्शनरांचे शहर असेही ख्यातकीर्त होत आहे. बेरोजगारींमुळे येथील तरुण हतबलता आणि सैरभैर वृत्तीलाही बळी पडत आहेत.

स्थानिक नागरिकांची मानसिकता शहर विकासाबाबत नेहमीच भलाबुरा परिणाम करत असते. सोलापूर शहरांमध्ये अद्यापही म ानसिक स्तरावर खूप मोठी प्रगती होण्याची गरज आहे. हे शहर आपले आहे, असे वाटण्यासाठी विशिष्ट मानसिक संस्कृतीच गरजेची असते. कोणतीही सुंदर संस्कृती पोट भरल्यानंतर येणाऱ्या समाधानातूनच उगम पावते. रोजच्या चरितार्थासाठी येथील तरुण जोवर सक्षम होत नाहीत, तोवर हे शहर आपले आहे; अशी भावना कशी निर्माण होणार ? या दृष्टीने 'बेरोजगारी' या समस्येवर अधिक लक्ष देऊन येथील उद्योगविश्व विस्तारण्यासाठी शासन-प्रशासन पातळीवर प्रगती होणे गरजेचे आहे.

स्थानिक नागरिकांची मानसिकता शहर विकासाबाबत नेहमीच परिणाम करत असते. सोलापूर शहरांमध्ये अद्यापही याबाबत खूप मोठी प्रगती होण्याची गरज आहे. हे शहर आपले आहे, असे वाटण्यासाठी विशिष्ट मानसिक संस्कृतीच गरजेची असते. कोणतीही सुंदर संस्कृती पोट भरल्यानंतर येणाऱ्या समाधानातून उगम पावते. रोजच्या चरितार्थासाठी येथील तरुण जोवर सक्षम होत नाहीत, तोवर हे शहर आपले आहे अशी भावना कशी निर्माण होणार ? या दृष्टीने येथील बेरोजगारी या समस्येवर अधिक लक्ष देऊन येथील उद्योग विश्व विस्तारण्यासाठी शासन प्रशासन पातळीवर कसोशीने प्रयत्न होणे आणि बाहेरील उद्योग येथे कसे येतील याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर बाहेरून आलेले उद्योग येथे स्थिरावतील कसे आणि टिकतील कसे ? याचाही विचार स्थानिक नागरिकांनी करणे आवश्यक वाटते. एकूणच स्थानिक नागरिकांची व नेते मंडळींची महत्त्वाकांक्षा सोलापूरच्या विकासासाठी वाढीव प्रमाणात आवश्यक आहे.

---

## मला भावलेली माणसं


# सोलापूर विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. इरेश स्वामी




शोभना सागर

ज्येष्ठ लेखिका, सोलापूर

९२२५८३८८९५

**नम्रता, आध्यात्मिकता, प्रेमळता, विद्वता, संस्कार-दाता असे अनेक गुणसंपन्न व्यक्तिमत्वाने एकवटलेले आदर्श गुरुवर्य म्हनजे डॉ. इरेश स्वामीसर. त्यांचे संपूर्ण नांव डॉ. रेरेश सदाशिव स्वामी. मुळगांवचे ते लक्ष्मीदहिवडीचे. कित्येक दिवस पंढरपूरचे रहिवासी. माझं माहेरही पंढरपूर- आपल्या माहेरची माणसं भेटली की, मन भरून येतं. माझे वडीलही दिसायला आणि स्वभावानेही स्वामीसरांसारखेच. त्यांना पाहिले की, मला वडीलांची साप्ताव मूर्ती दिसते. त्यांचा जन्म ११/९/१९-४२ सालचा. शिक्षण पीएच. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. त्यांना आध्यालिक लेखनाबरोबर हिंदी भाषेबद्दल तितकाच आदर, हिंदी, मराठीवर प्रभुत्व तर आपल्या कानडी भाषेवर, मातृभक्तीचा अभिमान, असा हा निवेणी संगम. ४० वर्ष रिसर्च अनुभव, ३२ वर्ष एम् फिल नेशनल असोसिएटारीप पाच वर्षे यु.जी. सी. दिल्लीकडून मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण, माजी अधिष्ठाना कला विभाग, हिन्दी मेंबर बोर्ड ऑफ स्टडीज, मैंबर ऑफ ॲकेडेमिक कौन्सिल, सदस्य सिनेट, ग्रंथालय समिती, हिंदी प्राध्यापक परिषद ३-समितीवर माजी सदस्य व हिंदी विकास मंच सोलापूर संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. सोलापूर जिल्हा कृतपन लेखक मंचचे आजीव सदस्य आहेत.**




'हिन्दी का यामा साहित्य' है हिन्दी पुस्तकाने लेखक तसेच 'शब्दकळा, हेलपाटा', 'दिखी अक्षर, स्वातं न्याची किंमत, स्वधर्म-परथर्म' क्षमाशील, शाळेला सुट्टी, खेळ खेळाडू', 'विठोबा, देशोदेशीच्या कथा, 'चाणक्य नीतीसार गई', 'सिद्धरामे खर चरित्र कथा मृतसार, पुस्तके त्यांनी केले आहे. नीतीसार, 'शहामृग इत्यादि मराठी एक यांची प्रसिद्ध झालेणि आहेत. तसेच हिंदी सात पुस्तकाचे संपादन त्यांच्या साहित्य, शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल यांना आदिशक शुक्रेश्वरी पुरस्कार,' 'डॉ. आनंद प्रकाश दीक्षित भाषान्यास पुरस्कार,' आदर्श शिक्षक पुरस्कार, रोटरी एक्सेलेन्स अवाडे, आई जोगेखरी-पुरस्कार गांधी फोरम पुरस्कार, मानवभूषण पुरस्कार, अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करव्यांत आले आहे. त्यांचे अनेक हिन्दी लेख, धार्मिक लेख, मराठी लेख विपुल प्रमाणांत प्रसिद्ध झाले आहेत, मल्टी क्लास-रूम, कॉम्लेक्स आणि कॉम्पुटर सायन्स बिलिंगसाठी ८.१.२८ करोड तसेच सोलापूर विद्यापीठाच्या डेव्हलपमेंट वैयक्तिक संस्थाकडून ६-३ लाख फंड जमा केले. सालपुर आकाशवाणी, विविध संस्थेवरती यांची कारखाने असतात. त्यांच्या साहित्य, शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल यांना आदिशक शुक्रेश्वरी पुरस्कार डॉ. आनंद प्रकाश दीक्षित भाषान्यास पुरस्कार आदर्श शिक्षक पुरस्कार रोटरी एक्सेलेन्स अवाडे, आई जोगेखरी-पुरस्कार गांधी फोरम पुरस्कार, मानवभूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करव्यांत आले आहे. त्यांचे अनेक हिन्दी लेख धार्मिक लेख, मराठी लेख विपुल प्रमाणांत प्रसिद्ध झाले आहेत, मल्टी क्लास रूम, कॉम्लेक्स आणि कॉम्पुटर सायन्स बिलिंगसाठी ८.१.२८ करोड तसेच सोलापूर विद्यापीठाच्या डेव्हलपमेंट वैयक्तिक संस्थाकडून ६.३ लाख फंड जमा केले. सालपुर आकाशवाणी, विविध संस्थेवरती यांची कारखाने असतात.

आदरणिय, इरेश स्वामीसरांचा माझा परिचय खूप वर्षापूर्वीचा अगदी माहेर पंढरपुरांपासून सरांचा सोलापुरांत ही अ.भा. साहित्य संमेलन, संत नामदेव महाराज साहित्य संमेलन, सोलापूर जिल्हा कृतपत्रलेखक मंच कार्यक्रम, पू- साने गुरुजी कथामाला शाखा सोलापूर महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर अशा अनेक संस्थामध्ये सतत भेट घडत असते. माझ्या एकसष्ठीच्या कार्यक्रम ास प्रमुख पाहुणे म्हणून पतीपत्नी उभयतांनी उपस्थित राहून मला आशिर्वाद दिला दोघांचा स्वभाव शांत, मनमिळावू. मास्था तिर्थ विठ्ठल-क्षेम विठ्ठल या संत-साहित्य आवृत्ती भाग एक व दोन पुस्तकांला नामदेव पायरी असे नांव देऊन त्यांनी प्रस्तावना दिली. आजही माझ्या कुठल्या ही कार्यक्रमांला आमंत्रित कुठे तर सरांनी कधीच नकार दिला नाही. मला त्यांच्याबद्दल आजही आदर, अभिमान आणि प्रेरणास्थान वाटतो कारण यांचे कार्य हे सोलापूरने वैभव आहे. अशी सन्माननिय व्यक्ति मनांस कायमची भावलेली आणि जन्मभर समणानुबंधान रहाणारी.






# जागतिक निसर्ग संवर्धन दिन : पर्यावरण रक्षणाची दिशा

**दरवर्षी २८ जुलै हा दिवस जागतिक निसर्ग संवर्धन दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. या दिनाचे उद्दिष्ट म्हणजे निसर्गाचे महत्त्व अधोरेखित करणे, पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण करणे आणि पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन सुनिश्चित करणे. या वर्षीच्या जागतिक निसर्ग संवर्धन दिनाची थीम ही जैवविविधतेचे संरक्षण आणि खराब झालेल्या परिसंस्था (Ecosystems) पुनर्संचयित करणे हे आहे.**

निसर्गाचे महत्त्व हवा, पाणी, अन्न, औषधे, इंधन यांसारख्या जीवनावश्यक गोष्टी निसर्गातूनच मिळतात. निसर्ग ही मानवी जीवनाचे अस्तित्व टिकवून ठेवण्याकरिता अत्यंत गरजेचे आहे. हवा, पाणी, अन्न, औषधे, इंधन या सर्व जीवनावश्यक गोष्टी आपल्याला निसर्गातूनच मिळतात. वनस्पती व प्राणी हे जैवविविधतेचा भाग आहेत. त्यांनी निसर्गातह: अन्न साखळी निर्माण करून ते पर्यावरणाचा समतोल राखण्यात मदत करतात. मानव सुद्धा निसर्गाचाच घटक आहे. त्यामुळे निसर्गाचे रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

नैसर्गिक साधनसंपत्ती मध्ये दोन प्रकारची ऊर्जा देणारी संसाधने आहेत. नवीकरणीय ऊर्जा स्रोत (Renewable Energy Sources ) म्हणजे असे स्रोत जे नैसर्गिकरीत्या सतत निर्माण होतात आणि संपत नाहीत. हे स्रोत पर्यावरणपूरक आणि प्रदूषणमुक्त असतात (उदा. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जलऊर्जा, जैवइंधन / बायोगॅस, भूऔष्णिक ऊर्जा). नवीकरणीय ऊर्जा स्रोत सतत निर्माण होऊन ती प्रदूषणविरहित, दीर्घकालीन वापरासाठी योग्य व पर्यावरणास सुरक्षितअशी मानली जाते.

अनवीकरणीय ऊर्जा स्रोत (Non-renewable Energy Sources) म्हणजे असे स्रोत जे एकदा वापरले की पुन्हा तयार होण्यासाठी हजारो वर्षे लागतात किंवा ते संपूर्णपणे संपून जातात (उदा. कोळसा, खनिज तेल / पेट्रोलियम, डिझेल, पेट्रोल, नैसर्गिक वायू, अणुऊर्जा). ऊर्जा स्रोत मर्यादित प्रमाणात उपलब्ध असून वापरल्यानंतर नष्ट होतात, तसेच पर्यावरणासाठी हानिकारक असून हवामान बदलास कारणीभूत ठरते.

**आजची निसर्गविनाशाची स्थिती:** आज आपला निसर्ग गंभीर संकटात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच मानवाने निसर्गावर मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप केला आहे. याचा परिणाम म्हणजे निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे. वाढती लोकसंख्या, जंगलतोड, औद्योगीकरण, शहरीकरण, प्लास्टिकचा अतिरेक, प्रदूषण आणि हवामान बदल यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. तसेच जैवविविधता धोक्यात येऊन अनेक प्राणी व वनस्पतींच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. मानवी गरजा भागवताना निसर्गसंपत्तीचा बेसुमार वापर केला जात आहे. ही स्थिती मानवी लोभ आणि अयोग्य विकास धोरणांचा परिणाम आहे. या सगळ्याचा थेट परिणाम म्हणजे वाढते तापमान, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर, वणवे, आणि अन्नसाखळीचे विघटन. मानवी आरोग्यावरही हे परिणाम स्पष्टपणे जाणवत आहेत.

**जैवविविधतेचे संवर्धन:** २०२५ या वर्षीच्या जागतिक निसर्ग संवर्धन दिनाची थीम ही जैवविविधतेचे संरक्षण असल्याने आपण आधी जैवविविधतेबाबत माहिती करून घेणे गरजेचे आहे. जैवविविधता म्हणजे पृथ्वीवरील सर्व सजीवांची विविधता प्राणी, पक्षी, वनस्पती, सूक्ष्मजीव, आणि त्यांच्या अधिवासांची एकसंध रचना. ही विविधता पर्यावरणाच्या सम





- डॉ. उमेश काकडे

सोलापूर

९८६९३५३४५५



तोलासाठी अत्यंत आवश्यक आहे. मात्र अलीकडच्या काळात मानवी कारणांमुळे जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत आहेत. जंगलतोड, प्रदूषण, हवामान बदल, अतिक्रमण, अ-स्थानिक प्रजाती यामुळे अनेक सजीव प्रजाती नामशेष होत आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास म्हणजे अन्नसाखळीचा तुटलेला दुवा आणि परिसंस्थेचा बिघडलेला समतोल. नैसर्गिक अधिवासांचे जतन, लुप्तप्राय प्रजातींचे संरक्षण, आक्रमक प्रजातींचा आटोकाव करून स्थानिक प्रजातींचे संवर्धन केले करून पाणथळ जागा, जंगले आणि गवताळ प्रदेशांचे रक्षण केले पाहिजे. आणि मानव-वन्यजीव संघर्ष टाळणे ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे

वनस्पती आणि प्राण्यांचे संवर्धन (In-situ व Ex-situ- - पद्धतीने) वनस्पती आणि प्राणी हे पर्यावरणाच्या समतोलासाठी अत्यंत आवश्यक घटक आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास आणि अनेक प्रजाती नाम शेष होण्याच्या मार्गावर असल्याने त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. वनस्पती आणि प्राण्यांचे संवर्धन करण्यासाठी दोन मुख्य प्रकार वापरले जातात. दोन्ही पद्धती एकमेकांच्या पूरक असून जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

**१. स्थलसंधारित संवर्धन (In-situ Conservation/ मूळ अधिवासात संवर्धन)** या पद्धतीत वनस्पती व प्राण्यांचे त्यांच्या नैसर्गिक अधिवासातच संरक्षण केले जाते. त्यामुळे ते आपल्याच वातावरणात नैसर्गिकरीत्या वाढू शकतात व पुनरुत्पादन करू शकतात.

उदाहरणे: राष्ट्रीय उद्याने उदा. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (मुंबई), वन्यजीव अभयारण्ये उदा. पेंच अभयारण्य, जैवमंडल राखीव क्षेत्रे उदा. सातपुडा जैवमंडल, पचमडी (मध्यप्रदेश), पवित्र वनक्षेत्रे/ देवराई स्थानिक परंपरेनुसार संरक्षित जंगल क्षेत्र. मूळ अधिवासात संवर्नाचे अनेक फायदे आहेत. यात नैसर्गिक परिसंस्थेचे जतन होते तसेच प्रजाती नैसर्गिकरित्या वाढतात व जैवविविधतेचा समतोल राखला जातो. या प्रकारच्या संवर्धनकरिता तुलनेने खर्च कमी येतो.

**२. स्थलांतरित संवर्धन (Ex-situ Conservation/ अधिवासाबाहेर संवर्धन)**

या पद्धतीत वनस्पती किंवा प्राण्यांचे त्यांच्या नैसर्गिक अधिवासाबाहेर, संरक्षित आणि कृत्रिम वातावरणात संवर्धन केले जाते. हे विशेषत: लुप्तप्राय किंवा संकटग्रस्त प्रजातींसाठी उपयुक्त ठरते.

यात प्राणी संग्रहालये संकटग्रस्त प्राण्यांचे संगोपन व पुनरुत्पादन, वनस्पती उद्याने दुर्मिळ वनस्पतींचे जतन, बीज बँका दुर्मिळ झाडांच्या बिया साठवून ठेवणे, जीन बँका प्रजातींचे अनुवंशिक घटक जतन करणे आणि क्रायोप्रेझर्वेशन जननक्षम पेशी, बीज किंवा गर्भ गोठवून ठेवणे.

अधिवासाबाहेर संवर्धनाचे पण अनेक फायदे आहेत. यामुळे लुप्तप्राय प्रजातींचे रक्षण होते, संकटग्रस्त प्रजाती पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडता येतात, आणि मानवी नियंत्रणाखाली वाढ शक्य होते.

अपारंपरिक ऊर्जेचा पर्यावरणासाठी लाभ

आजच्या युगात ऊर्जा ही मानवाच्या जीवनातील अत्यावश्यक गरज बनली आहे. घरे, कारखाने, वाहतूक, शेती, शिक्षण, आरोग्य प्रत्येक क्षेत्रात ऊर्जेचा वापर अनिवार्य आहे. मात्र पारंपरिक ऊर्जास्रोत जसे की कोळसा, डिझेल, पेट्रोल यांचा अतिरेकी वापर केल्यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहेत. यामुळे वायू प्रदूषण, जलवायू बदल होऊन नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होत आहे. या समस्येवर उपाय म्हणून अपारंपरिक (नवीकरणीय) ऊर्जास्रोतांचा वापर (उदा. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जलऊर्जा, बायोगॅस इत्यादी) हा एक प्रभावी आणि शाश्वत मार्ग आहे. हे स्रोत प्रदूषणमुक्त असून नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण करतात तसेच आरोग्यावर सुद्धा सकारात्मक परिणाम दिसून येतात .

**निसर्ग संवर्धनासाठी खालील उपाय सुचवता येतील:**

**झाडे लावा, झाडे जगवा**
**प्लास्टिकचा वापर कमी करा**
**ऊर्जेचा योग्य वापर करा**
**जलसंवर्धन, मृदासंवर्धन याकडे लक्ष द्या**
**अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवा**
**कचरा कमी करा, पुनर्वापर करा**
**पर्यावरण शिक्षणाला प्रोत्साहन द्या**
**शालेय निबंध, चित्रकला, भाषण स्पर्धा घ्या**
**वृक्षारोपण, शहरी हरित प्रकल्प, स्वच्छता मोहिमा राबवा**
**सामुदायिक सहभागातून पर्यावरण रक्षण करा**

निसर्गाचे रक्षण करणे तसेच आपल्याला निसर्गाने दिलेल्या संसाधनांचा योग्य पद्धतीने वापर करुन त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आपल्या लहानशा कृतींमधूनही मोठा सकारात्मक बदल घडू शकतो. जागतिक निसर्ग संवर्धन दिन हे केवळ एक औपचारिक दिन नसून, तो संकल्पाचा दिवस असावा एक स्वच्छ, हरित, आणि समतोल पृथ्वी घडवण्याचा. ''निसर्ग वाचवा, पृथ्वी वाचवा हीच खरी पुढील पिढ्यांसाठीची शाश्वत शपथ!'' **(लेखक पर्यावरण व वनस्पतीशास्त्राचे संशोधक आहेत)**



# माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक अधिकाऱ्याचे गाव



रोहिणी भाजीभाकरे
केंद्रीय ग्रामविकास विभाग सचिव (दिल्ली)

अश्विनी वाकडे
वारंगना महापालिका आयुक्त (तेलंगणा).

स्वप्निल पाटील
सचिव केंद्रीय ग्रामविकास मंत्री (दिल्ली)

शिवप्रसाद नकाते
आयुक्त उत्पादन शुल्क राजस्थान.

संदीप भाजीभाकरे
पोलीस उपायुक्त पुणे

## माढा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याची मान उंचावणारी गोष्ट

**माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक हे एक छोटस गाव असलं तरी माढा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याची मान उंचवणारी गोष्ट म्हणजे या गावाची ओळख अधिकाऱ्याची गाव म्हणून सर्व दूर झाली आहे.**

पोलिसांचे गाव, सैनिकांचे गाव, पुस्तकांचे गाव अशी अनेक गावे आजवर आपण पाहिली आहेत. पण सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक हे गाव प्रशासकीय अधिकाऱ्यांचे गाव म्हणून नावरूपास आले आहे. या गावाने आजपर्यंत तीन कलेक्टर, एक आयआरएस, एक आयपीएस, आरटीओ, तहसीलदार आणि १८ पोलिस उपनिरीक्षकांसह म हसूल, बांधकाम, जिल्हा परिषद, समाजकल्याण अशा विविध विभागांतील पन्नासहून अधिक अधिकारी प्रशासनाला दिले आहेत. परराज्यांतील प्रशासनातही उपळाईतील अधिकाऱ्यांचा दबदबा आहे.

सोलापूर शहरापासून ८० किलोमीटरवर माढा-शेटफळ रस्त्यावर सुमारे नऊ हजार लोकसंख्येचे उपळाई बुद्रुक हे गाव. येथील तरुणांनी गावातील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आणि रयत शिक्षण संस्थेच्या नंदिकेश्वर विद्यालयात शिक्षण घेऊन जिद्द, चिकाटी आणि प्रयत्नांच्या बळावर स्पर्धा परीक्षेतील यशाला गवसणी घातली आहे. केवळ एकमेकांच्या प्रेरणेमुळे गावातील तरुणाईने दिशादर्शक वाटचाल केली आहे.

२००३ मध्ये लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून पोलिस उपअधीक्षक म्हणून डॉ. संदीप भाजीभाकरे हे पहिल्यांदा पोलिस दलात रुजू झाले. त्यानंतर त्यांची बहीण रोहिणी भाजीभाकरे या जिल्हाधिकारी झाल्या आणि त्यानंतर गावातील तरुणाईचा नूरच बदलला.

बहुतेक तरुण स्पर्धा परीक्षेत उतरू लागले. त्यानंतर एकेक करत गेल्या २० वर्षांत तब्बल ६० अधिकारी उपळाई बुद्रुकने प्रशासनाला दिले. त्यापैकी बहुतेक महाराष्ट्रात आहेतच. काही जण राजस्थान, तमिळनाडू, तेलंगणा आणि दिल्लीसारख्या राज्यातही आपलं आणि आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करत आहेत.



शेखर म्हेत्रे

माढा

८६६९०८९४०७

**उपळाई बुद्रुक चे अधिकारी....**

३ आयएएस
१ आय आर एस
१ पोलीस उपायुक्त
२० पोलीस उपनिरीक्षक
५० पेक्षा अधिक इंजिनिअर
५० प्राध्यापक
१०० हून अधिक शिक्षक
१ तहसीलदार
१ वित्त व लेखा अधिकारी
१ तालुका कृषी अधिकारी
१ म्हाडा कार्यकारी अभियंता
१ आरटिओ
१ जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१ सहायक कामगार आयुक्त
यासह अन्य इतर क्लास २ अधिकारी आहेत.

डॉ. संदीप भाजीभाकरे हे सध्या पुण्यात पोलिस उपायुक्त आहेत. तर त्यांची बहीण आएएस रोहिणी भाजीभाकरे या केंद्र सरकारच्या ग्रामविकास मंत्रालयात सचिव आहेत. या आधी त्या तामिळनाडूत सेलमच्या जिल्हाधिकारी होत्या. आयएएस शिवप्रसाद नकाते हे राजस्थान मध्ये जिल्हाधिकारी होते.आता ते राजस्थानच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त झाले आहेत. आयएएस आश्विनी वाकडे या तेलंगणातील वारंगणा येथे महापालिका आयुक्त आहेत. आयआरएस स्वप्नील पाटील हे दिल्लीत केंद्रीय ग्रामविकास मंत्री यांचे सचिव म्हणून कार्यरत आहेत.

उपळाई बुद्रुक येथील प्रमोद शिंदे म्हाडामध्ये कार्यकारी अभियंतापदी, तर श्रीकृष्ण नकाते सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरदीप वाकडे तहसीलदार, संजय वाकडे हे उपविभागीय कृषी अधिकारी आहेत. मीनाक्षी वाकडे या वित्त व लेखा अधिकारी म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेत कार्यरत आहेत. त्याशिवाय सचिन कवले हे सोलापुरात सहायक समाज कल्याण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे छोटे बंधू नितीन कवले हे मुंबईत सहायक कामगार आयुक्त आहेत. याशिवाय १८ पीएसआयसह ३० ते ४० तरुण पोलिस दलात कार्यरत आहेत. तसेच महसूल, जिल्हा परिषद या विभागात अधिकारी-कर्मचारी म्हणून गावातील अन्य काही तरुण कार्यरत आहेत.

MEDICAL · SPORT

---



दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

राज्य उपाध्यक्ष

- स्पर्धा परीक्षा शैक्षणिक सामाजिक न्याय व शिक्षक भरती संघटना, महाराष्ट्र
- प्राध्यापक (सेट/नेट) पी.एचडी भरती संघटना महाराष्ट्र राज्य.
- डी.एड.बी.एड.स्टुडंट असोसिएशन महाराष्ट्र राज्य.

**मा.प्रशांत (अप्पू) शिरगुर**

---

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

|| ओऊम ||
|| तमसो मा ज्योतिर्गमय ||
डी.ए. व्ही. कॉलेज अँण्ड मॅनेजमेंट सोसायटी, नवी दिल्ली, संचलित

**रामभाऊ जोशी हायस्कूल व डी.ए.व्ही. महात्मा आनंद स्वामी सरस्वती ज्यु. कॉलेज**

करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

---

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

**प्रा. रेश्मा माने** (संस्थापक अध्यक्ष)

सचिव प्रियदर्शी माने, खजिनदार सुप्रिया माने

**युगंधर फाऊंडेशन सोलापूर आणि युगंधर फाऊंडेशन परिवार**

---



दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



**मा.श्री.दत्तात्रय जाधव**

सदस्य भाजपा राज्य परिषद (सरपंच) वडशिंगे, माढा

शुभेच्छुक

**भारतीय जनता पार्टी**

माढा तालुका पूर्व व ग्रामपंचायत वडशिंगे

---

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास

**हार्दिक शुभेच्छा!**

**प्रो.प्रा. निखिल समाधान व्यवहारे**

9604937591
8208225692

**न्यू निखिल टायर्स**

YOKOHAMA, Apollo टायर्सचे अधिकृत विक्रेते

apollo · YOKOHAMA · MRF TYRES · CEAT · JK TYRE

EXIDE कंपनीच्या सर्व प्रकारच्या बॅटऱ्या योग्य दरात मिळतील.

एस.टी.स्टँड जवळ, ग्रा.पं. गाळा नं. ८ करकंब, ता. पंढरपूर

---

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

नगराध्यक्षा

मार्गदर्शक — मा. आमदार धनाजीराव साठे
आमचे नेते — दादासाहेब साठे
युवा नेते — वेदांत भैय्या साठे



अॅड. मिनलताई दादासाहेब साठे

नगरसेवक



**मा.श्री.अरुण कदम**

शुभेच्छुक

**श्री.गणेश एंटरप्रायजेस**

@ सिमेंट पाईप माढा

प्रोप्रा. - अरुण वसंत कदम

---



**मा. अनिल कोकीळ**
संपर्क प्रमुख, सोलापूर जिल्हा

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**मा. श्री. दत्तात्रय गणेशकर**
शिवसेना उपजिल्हाप्रमुख, सोलापूर

श्री. दादासाहेब गणेशकर (विभाग प्रमुख : प्रभाग-६)

विष्णू लोंढे । दत्ता गलाटे । रसूल पठाण

---

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



धनराज मठपती — सरपंच लासोना
सुभाष माने — चेअरमन तथा सदस्य लासो
अंकुश माने — उपसरपंच
अनंत कुठे — ग्राम विकास अधिकारी

**सर्व सदस्य लासोना ता. देवणी**

---

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित,

**महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज, बोरामणी**

ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी (CBSE)

ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, सोलापूर (CBSE)

ग्लोबल व्हिलेज माध्य. व उच्च माध्य. कनिष्ठ महाविद्यालय, बोरामणी

ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बोरामणी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित

**''आजोळ-विहान'', (गुरु सेवा) बोरामणी**

कोविड-१९ मुळे अनाथ आणि निराधार झालेल्या मुलासाठी आणि वृद्धांसाठी पुनर्वसन प्रकल्प...!

महात्मा गांधी ग्लोबल व्हिलेज, नॅशनल हायवे ६५, बोरामणी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर.
Email: latlebichanshettiguruji@gmail.com
Website: www.globalvillagesolapur.com

सौ. सुजाता बादोले — खजिनदार
सौ. संगिता शहा — सचिवा
प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी — अध्यक्ष

मल्लिनाथ जळकोटे — अधिक्षक, ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल
आस्मा नदाफ — प्राचार्या, ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल अँन्ड ज्युनियर कॉलेज
डॉ. शंकर राठोड — प्राचार्य, ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
प्रा. अनिकेत चनशेट्टी — समन्वयक, ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल

**व समस्त ग्लोबल परिवार....**






श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर, जुनी पोलीस लाईन, सोलापूर.

दैनिक सोलापूर
तरूण भारतच्या
वर्धापन दिनानिमित्त

**हार्दिक शुभेच्छा!**

- दररोज सकाळ, संध्याकाळ नित्य पूजा, आरती आणि धार्मिक कार्यक्रम
- दर गुरुवारी सकाळी पूजा व अभिषेक तर संध्याकाळी भजन आणि प्रवचन कार्यक्रम तसेच महाप्रसाद वाटप.



मा. श्री. प्रमोद डोंगरे

शुभेच्छुक

**मा. श्री. प्रमोद डोंगरे**
(अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ न्यास संस्था, जुनी पोलीस लाईन, निराळे वस्ती रोड, सोलापूर.)

दैनिक सोलापूर
तरूण भारत
वर्धापन दिनानिमित्त

**हार्दिक शुभेच्छा!**

| अध्यक्ष/कामगार नेते | अध्यक्ष | कार्याध्यक्ष |
|---|---|---|
|  |  |  |
| मा.अशोक जानराव | मा.लिंबराज जेटीथोर (कामगार क्रांती युनियन) | मा.शेषराव शिरसट |

शुभेच्छुक

प्रदीप जोशी, बाबासाहेब क्षीरसागर, तेजस्विता कासार, अजय क्षीरसागर, लिंबराज जेटीथोर , अनिल जगझाप, उमेश गायकवाड, अनिल बनसोडे, असंग कांबळे, श्रीनिवास कांबळे, दत्ता तुळसे , विद्यासागर मस्के, नीलमणी इंगळे, अंबादास डावरे, सतीश नागटिळक, राहुल बनसोडे ,पप्पू सातपुते, सुनील राठोड, विठोबा शिंदीबंदी, विजय सकट, सुनील भालेराव, प्रकाश सोनवणे, किरण चंदनशिवे, अमोल कांबळे, सुधीर कांबळे, स्वप्नील गवळी, शशिकांत वडावराव, राजेंद्र बनसोडे, रवी बनसोडे, परशुराम रामगल, भारत क्षीरसागर यांच्यासह सर्व पदाधिकारी सदस्य कर्मचारी वृंद.

**कामगार क्रांती युनियन** | **सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समिती, सोलापूर**






# मोहोळ तालुक्याला लाभलाय ८५० वर्षांचा समृध्द इतिहास

**सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक घडामोडीमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावणाऱ्या मोहोळला संपन्न असा ऐतिहासिक, धार्मिक राजकीय व सामाजिक, सांस्कृतिक वारसा लाभला आहे. त्याचप्रमाणे मध्यवर्ती स्थान, बाजारपेठ उपलब्धता, राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे वाहतूक इत्यादी दृष्टीने मोहोळचे भौगोलिक स्थान सुद्धा विकासाच्या दृष्टीने केंद्रस्थानी आहे. मोहोळला शतकानुशतके जुना समृद्ध इतिहास आहे, विविध शासक आणि राजवंशांनी त्याच्या विकासावर प्रभाव टाकला आहे. प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडात अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. त्यांच्या राजवटी मोहोळ तालुक्याने पाहिलेल्या आहेत.**

सोलापूर जिल्हा मुख्यालयापासूनचे अंतर ३४ किमी आहे ,सन १९५० च्या राज्य पूर्नरचनेत हैद्राबाद संस्थानातील ६४ गावे, मिरज संस्थानातील ६ गावे व माढा तालुक्यातील २० गावे मिळून अशा ९० गावांचा हा तालुका निर्माण झाला आज या तालुक्यात १०१ गावे असून त्यापैकी खरकटणे, घोरपडी, पवारवाडी ही ३ गावे काल प्रवाहामध्ये नामशेष झाली आहेत. मोहोळ तालुका हा आवर्षण प्रवण क्षेत्रामध्ये मोडतो, हवामान उष्ण व कोरडे फळबागांसाठी पोषक आहे, सरासरी पर्जन्यमान ५७३.९ मिमी आहे. तालुक्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेती आणि लघु उद्योगांवर अवलंबून आहे.

**ऐतिहासिक -धार्मिक :**

मोहोळला ऐतिहासिक वारसा फार मोठा लाभला आहे. पांडव वनवासात व अज्ञात वासात फिरत असताना मोहोळ पासून दक्षिण पूर्वेस १५ कि.मी. अंतरावरती पांडव पोफळी येथे मुक्काम पडल्याची आख्यायिका सांगणारे गाव अस्तित्वात असल्याने दिसून येते. आज धर्मराजाचे मंदिर ही तेथे पहावयास मिळते. मोहोळ मध्ये इ. स. ११८५ सालचा शिलालेख आढळला, कल्याणीचे चालुक्यांचा शेवटचा राजा सोमेश्वर (चतुर्थ) याचा महाराष्ट्रात आढळणारा पहिला शिलालेख आहे. जवळपास ८५० वर्ष जुना हा शिलालेख मोहोळ तसेच चालुक्य राजसत्तेच्या व महाराष्ट्राच्या इतिहासात भर टाकणारा आहे.

११ व्या शतकातील चंद्रमौळी गणेश मंदिर हे मोहोळ तालुक्यासह जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. 'चंद्रमौलेश्वर' वरुन 'चंद्रमौळी' आणि पुढे मोहोळ असे मोहोळला नाव मिळाले आहे. मोहोळ शहरात देवगीरी यादव कालीन 'भानेश्वर' व 'निलकंठेश्वर' ही हेमाडपंथी शैलीची दोन मंदिरे आहेत शाहीरी परंपरा आणि भेदीक काव्य परंपरा १२ व्या शतकात मोहोळ मध्ये उदयास आली. दरम्यानच्या काळात मोहोळ मध्ये नागनाथ सांप्रदायाचा पाया रचला गेला. नागनाथ भक्त अज्ञानसिध्द यांनी लिहिलेला 'संकटहरणी हा ग्रंथ सन १३९१साली लिहला असून तो मोहोळ मधील पहिली साहित्यिक सपंदा मानली जाते.

मोहोळ, वडवळ,देगाव (वा) येथील प्रसिध्द नागनाथ मंदिर, कोरवली, परमेश्वर पिंपरी व नरखेड येथील सिध्देश्वर मंदिर ,अंकोली येथील भैरवनाथ मंदिर, पापरी येथील महादेवाचे मंदिर, वाळूज येथील वाळकेश्वर मंदिर ही हेमाडपंथी शैलीची मंदिरे पहावयास मिळतात.



१७ व्या शतकात करमाळ्याचे रावरंभा निबांळकर यांच्या जहागिरीमध्ये मोहोळ होते. साताराच्या छत्रपती घराण्याकडून देशमुखांना जहागिरी मिळाली असल्याने देशमुखांना जूना सरकार वाडा आणि देशमुखांची गढी आजही पहावयास मिळते. भीमा नदीच्या काठावर औरंगजेबचा मुक्काम असतांना त्यांच्या सैनिकांचे घोडे पाणी पिण्यास येत व घोडे बांधले जात असत. त्या ठिकाणीच 'घोडेश्वर' हे गाव वसले.

इतिहासप्रसिद्ध आष्टीची लढाई-आष्टीच्या सन १८१८ च्या इंग्रज-मराठा युद्धाने जरी मराठे शाहीचा अस्त झाला असला तरी या युद्धात सेनापती नरवीर बापू गोखलेंच्या नेतृत्वात मराठा फौजेने पराक्रमाची शर्थ केली होती. यात नरवीर बापू गोखले धारातीर्थी पडले. धूर्त इंग्रजांनी या लढाईनंतर येथील भूमीस महत्त्व प्राप्त होऊ नये व ऐतिहासिक महत्त्व कमी व्हावे म्हणून १८८८ मध्ये मोठे तळे खोदले आष्टीचा तलाव म्हणून ओळखला जातो.

सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांनी लिहिलेला प्रसिध्द असा 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातील ४ ध्या प्रकरणाचे जाहीर वाचन स्वतः महात्मा फुले यांनी मोहोळ तालुक्यातील कुरूल या गावी सन १८८४ साली केले होते.

**सामाजिक- राजकीय :**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये मोहोळ तालुक्यातील देशभक्तांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रामुख्याने कै गंगाधर अण्णा जोशी, कै.डॉ. श्रीनिवास जोशी, देशभक्त कै. संभाजीराव गरड, कै. मुनी महाराज, कै. दत्ता गायकवाड कै. संदिपान गायकवाड हे स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख शिलेदार होते. यांनी लढ्यात सत्याग्रह ,चळवळी करुन शिक्षा भोगल्या. संयुक्त महाराष्ट्राचा लढा लोकनेते बाबुराव पाटील यांचे मोर्चे व लोकशाहीर कै भाई विश्वासराव पाटील लोककला व कलापथकांच्या माध्यमातून जनजागृती केली. कै.बाबुराव पाटील अनगरकर १९५२ शेतकरी कामगार पक्षातर्फे तत्कालिन मोहोळ-वैराग मतदारसंघाचे पहिले आमदार म्हणून निवडून आले. १९७२ ते ७७ काळात नरखेडचे कै शहाजीराव पाटील यांनी काँग्रेसच्या तिकिटावर आमदारकी मिळवली कै. वसंत दादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात शहाजीरावांना सहकार-ग्रामविकास खात्याचे राज्यमंत्री म्हणून मंत्री पद मिळाले आणि तालुक्याचे ते पहिले मंत्री बनले. १९८० मध्ये कै चंद्रकांत निंबाळकर शेतकरी कामगार पक्षातर्फे आमदार झाले

**औद्योगिक विकास-:**

मोहोळ तालुक्यात साखर कारखाने, सूतगिरणी व औद्योगिक सहकारी संस्था कार्यरत आहे. १९८० साली तालुक्यातील पहिला कारखाना टाकळी सिकंदर येथे,भीमा सहकारी साखर कारखाना सुरू झाला १९९३ साली कापूस उत्पादकांचा विचार होऊन वाघोली येथे महात्मा फुले मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीची स्थापना करण्यात आली या गिरणीचे स्वतःचे उत्पादन करून परदेशी बाजारपेठ मिळवलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक धोरणाप्रमाणे चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित मोहोळ MIDC या संस्थेची स्थापना १९८६ करण्यात आली. २००२ मध्ये अनगर येथे लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना सुरू झाला . या कारखान्यामध्ये साखर निर्मिती बरोबरच सहवीज निर्मिती, आसवणी प्रकल्प ही सुरू आहेत त्याचबरोबर वटवटे येथे २०११ जकराया साखर कारखाना, आष्टी येथील कै औदुंबर पाटील सहकारी साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली आहे

**कृषी-सिंचन :**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीअंतर्गत कृषी संशोधन केंद्र मोहोळची वाटचाल चालू आहे येथे संशोधना बरोबर ज्वारी, हरभरा व करडई या पिकांच्या सुधारित वाणांचे बीज उत्पादन घेण्यात येते


सोलापूर जिल्ह्यातील कृषी विकासात तालुक्याचे स्थान अग्रभागी आहे, तालुक्यातुन भीमा,सिना व भोगावती या नद्या वाहतात येवतीतील पाझर तलाव, आष्टी, शिरापूर उपसा जलसिंचन योजना हे दोन मोठे प्रकल्प आहेत, तसेच भोयरे येथे २ टीएमसी धरण आहे. इ.स. १९८० उजनी धरण झाले नंतर मोहोळ तालुक्यात उजनीच्या पाण्यामुळे हरितक्रांती झाली डाव्या व उजव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी पुरवठा करण्यास सुरुवात झाली. भीमा-सीना जोडकालवा कार्यान्वीत झाला यातून मोहोळ तालुक्याच्या दक्षिण भागास पुरवठा झाल्याने आणि तालुक्यातील शेतीला पाणी पुरवठा होऊ लागला तालुक्याचे भाग्य उजळले.रब्बी हा तालुक्याचा प्रमुख हंगाम आहे यात ज्वारीचा समावेश होतो दुसरे महत्त्वाचे पीक गहू असून त्याचबरोबर कडधान्य, तृणधान्य भाजीपाला पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढू लागला आहे शेतकऱ्यांच्या जीवनात प्रचंड क्रांती करणारे ऊस,डाळिंब, केळी, द्राक्ष, पपई, बोर व फुले या क्षेत्राचा विस्तार होत आहे. उत्पादित झालेला मालाला देशाच्या महत्त्वाच्या बाजारपेठेपर्यंत सहजतेने पाठवता येते




गुरुराज कुलकर्णी

वाळूज, ता. मोहोळ

९३७३७२४८४५

शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाला चांगला प्रतिसाद मिळत आहे दुग्ध प्रक्रिया उद्योग म्हणजेच ग्रामीण भागात खवा तयार करण्यासाठी गावागावांमध्ये खव्याच्या भट्ट्या सुरू झाल्या आहे, सिंचन क्षमता, रस्त्यांचे जाळे इत्यादी पायाभूत सुविधा पाहता मोहोळ तालुक्याच्या कृषी औद्योगिक विकासाला मोठा वाव आहे

मोहोळ तालुक्याचा अतिशय वेगाने होत असलेल्या विकासाला दळणवळणाने महत्त्वाचा हातभार लावला आहे. राष्ट्रीय महामार्ग ,रेल्वे मार्ग ,राज्य मार्ग उत्पादन वाढीस चालना मिळत आहे अशा कृषी प्रक्रिया उद्योग, फुड इंडस्ट्री हॉटेल व्यवसाय, लघुउद्योजकांना रोजगार प्राप्त झाला आहे. उदाहरणार्थ लांबोटी येथील शेंगा व चटणी संपूर्ण देशात सुप्रसिद्ध असुन एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

तालुक्यात राष्ट्रीय बँका, शेड्युल्ड बँका सहकार क्षेत्राचे जाळे विस्तृत आहे विविध कार्यकारी सेवा संस्था, ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था ,पगारादार पतसंस्था ,मजूर संस्था, पाणी वापर संस्था या सहकारी संस्थांनी उल्लेखनीय काम केले आहे. औद्योगिक विकास व बेरोजगारांना काम मिळण्यासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या वित्तीय संस्थांनी मोठी जबाबदारी उचलली पाहिजे त्यांना आवश्यकतेनुसार पुरेशा व योग्य अशा कमी व्याजदरात अर्थ असावे मिळावे त्यातून रोजगाराभिमुख आधारित उद्योग उभारले जातील. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचे सौर ऊर्जा हे एक प्रभावी माध्यम आहे,या माध्यमातून वीज निर्मिती करण्यावर शासनाकडून भर दिला जात आहे आहे ;तालुक्यात पोखरापूर या ठिकाणी १० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यरत आहे.

**विकासातील अडथळे उपाययोजना :**

आजच्या परिस्थितीत महाराष्ट्र मध्ये ठराविक भागांमध्ये उद्योगाची गर्दी होऊ लागली आहे. मुंबई, पुणे ,औरंगाबाद, ठाणे येथे उद्योगाच निर्मितीसाठी अडचण निर्माण झाली आहे ते उद्योग महाराष्ट्रातील इतर भागात उभारणी झाली पाहिजे आहेत.वाढती लोकसंख्या,बेरोजगारी याचा विचार करता मोहोळ तालुक्यात, संपन्न अश्या मोठया औद्योगिक वसाहतीची उभारणी होणे आवश्यक आहे. सिंचनापासून वंचित असलेल्या तालुक्याच्या उत्तर भागात सिंचन व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी सीना -भोगावती जोडकालव्याची अत्यंत गरज आहे. राष्ट्रीय महामार्गावर मोहोळ असल्यामुळे व दळणवळणाची अनेक साधने उपलब्ध असल्यामुळे मोहोळ तालुका व शहर केंद्रबिंदू आहे,तीर्थक्षेत्रांना व प्रमुख शहरांना जोडणारा मार्ग मोहोळ मधून जातो, कर्नाटकला जाणारा बायपास महामार्ग शहरातूनच गेला आहे. सद्य परिस्थितीत मोहोळ येथील बसस्थानके अपुरे व गैरसोयीचे ठरत आहे, मोहोळ येथे नवीन सुसज्ज अत्याधुनिक बस स्थानक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे

तालुक्याच्या विकासात्मक दृष्टीने पाहता रेल्वे स्थानक होऊनहि कोणत्याच गाड्यांना येथे थांबत नाही, त्यामुळे व्यापारी व नागरिकांची मागणी पाहता या ठिकाणी रेल्वे गाड्यांना थांबा मिळाल्यास विकासाला चालना मिळणार आहे.

मोहोळचे भौगोलिक स्थान पाहता व सोलापूरच्या रेल्वे मालधक्क्यावर येणारा ताण पाहता मोहोळ येथे मालधक्का होणे मोहोळच नव्हे तर जिल्ह्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे सुविधा उपलब्ध केल्यास युवकांसाठी रोजगारनिर्मिती होऊ शकते.

मोहोळ येथे अत्याधुनिक अशा रुग्णालयाची उणीव प्रकर्षाने जाणवत आहे ,तसेच उच्चतंत्रज्ञान आणि वैद्यकीय महाविद्यालयाची गरज भासत आहे; शिक्षण व आरोग्याच्या दृष्टीने एक प्रकल्प होणे आवश्यक आहे. आष्टी येथे सेनापती बापू गोखले यांचे भव्य स्मारक झाले आणि तलाव परिसर एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले तर या तलावाच्या माध्यमातून या ठिकाणी नौकाविहार व अन्य साधने उपलब्ध केल्यास हे ठिकाण जिल्ह्यातील ऐतिहासिक पर्यटन होऊ शकते.

तालुक्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. भविष्यात पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊन सिंचनाच्या सोयींमध्ये सुधारणा, आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब आणि पिकांच्या विविधतेमुळे कृषी विकास वाढेल . चांगले रस्ते, पाणी आणि वीजपुरवठा यामुळे नवीन उद्योग येतील , पर्यटन स्थळांचा विकास होईल शक्यता आहे अशा प्रकारे सतत दुष्काळाचे सावट असणाऱ्या मोहोळ तालुक्यातील सर्व क्षेत्रात घटकांनी योगदान दिल्यास मोहोळ तालुक्याचा विकास शक्य होईल.

---

# पावसाळ्यातील सांधेदुखी आहार-विहार आणि जीवनशैली

**पावसाचे आगमन झाले की तब्येतीच्या वेगवेगळ्या तक्रारी सुद्धा सुरू होत असतात. सांधेदुखीचा त्रास हा त्यापैकीच एक. बसताना,उठताना, चालताना त्रास रुग्णास होऊ लागतो. ज्यांना सांध्यांचे, मणक्याचे विकार असतील त्यांनी नियमित व्यायाम योगासने करावीत आणि योग्य ते होमिओपॅथिक उपचार घ्यावेत.**



कालच ओपिडीमध्ये एका पेशंटने सांगितले की मॅडम मला जरा अंग मोडून आल्यासारखं झाले. माझे थांबलेले सांधे पुन्हा दुखण्यास चालू झाले आहेत, थोडी कणकणही वाटते. दुसऱ्या पेशंट सांगितला की मला गुडघेदुखीचा त्रास खूप चालू झाला आहे काही वर्षांपूर्वी गाडी स्लिप होऊन पडलो होतो तेव्हा इतका त्रास झाला नाही पण आता पावसाळा आला की मला गुडघेदुखी प्रचंड चालू होते. म्हणजे याचा अर्थ असा की पूर्वीच्या कोणत्याही प्रकारचा मुका मार त्यावेळी जरी बरा झाला असेल तरी पावसाळ्यात आभाळ आल्यानंतर म्हणजे ढगाळ वातावरण झाल्यानंतर सांधे हे दुखणे सुरू होतात.

अनेक रुग्णांमध्ये तर सकाळी उठल्यानंतर काही वेळ त्यांच्या टाचांना वेदना असतात त्यांना टाच दुखी असल्यासारखे वाटते व काही कालांतराने त्या वेदना थांबतात. अशा प्रकारची टाच दुखी,अंगदुखी तसेच गुडघेदुखी म्हणजे एकूण सांध्यांचा दुखणं हे पावसाळ्यामध्ये चालू होत असते. वातावरणाचा आपल्या शरीरावर खूप प्रभाव पडत असतो. या दिवसांमध्ये वादळ असते एकदम जोराची हवा सुटते त्यामुळे शरीरातील वायूचे म्हणजेच वात दोषाचे संतुलन बिघडण्यास सुरुवात होते. आणि मग पूर्वी झालेले अनेक सांध्यांचे विकार डोके वर काढताना दिसून येते.


पावसाळ्यामध्ये पचनशक्ती सुद्धा बंद होत असते त्यामुळे पोटामध्ये गॅसेसचे प्रमाण सुद्धा वाढते.

**काय केले पाहिजे ?**

शरीरामधील जे तीन दोष असतात वात,कफ व पित्त हे जेव्हा संतुलित असतात तेव्हा शरीरामध्ये कोणतेही दोष उत्पन्न होत नाहीत आणि वात दोष बिघडू जर द्यायचा नसेल तर आपल्याला शरीरातील काम म्हणजे हालचाल व्यवस्थित चालू ठेवणे,श्वासाचे नियमन व्यवस्थित राहण्यासाठी सांध्यांच्या हालचाली, पचन संस्था मजबूत करण्यासाठी काही उपाय करणे तसेच आहार -विहार, होमिओपॅथिक औषधोपचार व काही घरगुती उपायांचा सुद्धा आपण या ठिकाणी अवलंब करू शकतो.

**पावसाळ्यात आहार कसा असावा :-**

रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे पदार्थ आणि आहार घ्यावा ज्यामध्ये भाज्यांची खिचडी, मूग डाळ, डोसा, इडली, चिल्ला यासारखे तसेच नाचणी पासून तयार केलेले पदार्थ खा. पावसाळ्यात पचण्यास हलका असा आहार घ्यावा. पावसाळ्यामध्ये सूर्यदर्शन कमी प्रमाणात होत असते तर कधी ते होतच नाही यामुळे शरीरातील जठराग्नी म्हणजेच भूकही कमी - जास्त होत असते अशामुळे घेतलेले अन्न योग्य रीतीने पचत नाही व अतिरिक्त प्रमाणात पोटात गॅस होऊ लागतो म्हणजेच वायु साठू लागतो मग पोट गच्च झाल्यासारखे किंवा पोटदुखी ही चालू होत असते.. पोटात गॅस निर्माण करणाऱ्या वाटाणा, पावटा,शेंगदाणा यासारखे पदार्थ जपूनच खावेत. रोजच्या आहारात घरगुती साजूक तूप एक ते दोन चमचे घ्यावे. जेवताना कोमट पाणी प्यावे. जेवणामध्ये ताकाच्या कढीचा समावेश असावा.

डॉ. गौरी बाचल

बाल आरोग्य सेवा तज्ञ

९८६००८७६२७


आहारामध्ये लवंग, तमालपत्र, दालचिनी,जिरे, मोहरी, हिंगपूड, कढीपत्ता, हळद यांचा वापर असल्यास अन्न सहजरित्या पचण्यास मदत होते. जेवणानंतर आवर्जून शतपावली करावी शक्य असल्यास थोडा वेळ वज्रासनात बसावे. रात्रीचे जेवण झोपण्यापूर्वी कमीत कमी दोन तास आधी घ्यावे. अशा प्रकारच्या आहाराच्या योजनेमुळे अतिरिक्त प्रमाणात वाढणाऱ्या वायूवर नियंत्रण येण्यास मदत होते आणि पूर्वीचे आजार डोके वर काढत नाही.

**पावसाळ्यात काय खाणे टाळावे :-**

पावसाळ्यात पालेभाज्या, तळलेले पदार्थ, शिळे आणि मसालेदार पदार्थ तसेच काही फळे कमी प्रमाणात खावीत किंवा टाळावीत.पावसाळ्यात पालेभाज्यांमध्ये किटाणू आणि माती जास्त प्रमाणात असण्याची शक्यता असते, त्यामुळे पालक, मेथी, कोबी यांसारख्या भाज्या टाळणे चांगले. पावसाळ्यात पचनक्रिया मंदावलेली असते, त्यामुळे भजी, वडे, समोसे यांसारखे तळलेले पदार्थ खाणे टाळावे. पावसाळ्यात मासे आणि मांसाहार लवकर खराब होण्याची शक्यता असते, त्यामुळे ते जास्त प्रमाणात खाणे टाळावे. पावसाळ्यात वातावरणात ओलावा असल्याने अन्न लवकर खराब होते, त्यामुळे शिळे किंवा उघड्यावरील अन्न खाणे टाळावे.पावसाळ्यात थंडगार पेये आणि आईस्क्रीम खाणे टाळावे, कारण ते पचनासाठी चांगले नसतात. काहीवेळा पावसाळ्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता असते, त्यामुळे ते जास्त प्रमाणात खाणे टाळावे.

**घरगुती उपचार आणि जीवनशैली :-**

पावसाळ्यात चालायला जाणे तसेच बाहेर जाऊन करणारे लागणारे इतरही व्यायाम बऱ्याच प्रमाणात होत नाही किंवा त्यामध्ये सातत्य राहत नाही मग अशावेळी तुम्ही सूर्यनमस्कारासारखे जठराग्नी प्राकृत करणारे, सांध्यांना उपयुक्त असलेले पचनशक्ती सुरळीत करण्यासाठी योगासनासारखे व्यायाम करावेत. कपाल भारती, प्राणायाम यांच्या साह्याने पोटाच्या तक्रारी या कमी होतील त्यामुळे बद्धकोष्ठता व गॅसेस सारख्या समस्या पासून दूर राहण्यास मदत होईल . पावसाळ्यामध्ये शक्यतो भिजू नये तसेच डोके भिजू नये यासाठी टोपी,रेनकोट, छत्री वापरावी. बाहेरून आल्यावर गरम पाण्याने हात पाय धुवावेत.

सांधे दुखत असतील त्यांनी होमिओपॅथिक औषधे वापरावेत होमिओपॅथी मध्ये अतिशय उपयुक्त असलेली तेल आहेत जी सांधेदुखीच्या वेदना कमी करतात.

घरगुती उपायांमध्ये तुम्ही बद्धकोष्ठतेसाठी एरंडेल तेल गरम पाण्यातून घेण्यास हरकत नाही. एरंडेल तेलाचा उपयोग तुम्ही सांध्यावर सुद्धा करू शकता. एरंडेल तेल कोमट करून ते सांध्यावर लावावे जेणेकरून सांधेदुखी मध्ये आराम पडेल. जर सांधे सुजत असतील तर अंघोळीच्या पाण्यातच शेवगा सारख्या वनस्पतीच्या पाल्याची पुरचुंडी करून ती घालावी व अशा उकळविलेल्या पाण्याने सांध्यांना शेक द्यावा. पावसाळ्याचा आनंद घ्यायचा असेल तर आहारामध्ये आणि जीवनशैलीमध्ये थोडा बदल केला पावसाळा नेहमी सुसह्य होतो.






# कुडल संगम : निसर्ग, श्रद्धा आणि इतिहासाचा संगम

**सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला, महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर वसलेले एक अनोखे आणि दुर्लक्षित ठिकाण म्हणजे कुडल संगम (हत्तरसंग कुडल). भीमा आणि सीना नदीचा संगम असलेले हे स्थळ, केवळ धार्मिकदृष्ट्या नव्हे तर ऐतिहासिक, स्थापत्यशास्त्रीय आणि नैसर्गिक सौंदर्याच्या दृष्टीनेही अत्यंत महत्वाचे आहे.**

कुडल संगम हे सोलापूरपासून अवघ्या ३५ किलोमीटर अंतरावर आहे. सध्या सुरु असलेल्या सोलापूर - विजयपूर - बंगळूर सहापदरी महामार्गावरून सुमारे २५ कि.मी. प्रवास करून डावीकडे आणि पुढे १० कि.मी. अंतर पार केल्यावर हे ऐतिहासिक ठिकाण तुम्हाला सामोरे येईल.

येथे भीमा नदी (उत्तर दिशेने येणारी) आणि सीना नदी (पश्चिम दिशेने येणारी) यांचा संगम ढ आकारात होतो.

ही रचना भारतात फारच दुर्मिळ आहे, कारण बहुतांश संगम ध आकाराचे असतात. या संगमावर उभे आहेत प्राचीन वास्तुकलेचे दोन खजिने - संगमेश्वर आणि हरिहरेश्वर मंदिरे.

## श्री संगमेश्वर मंदिर

या मंदिराचा इतिहास चालुक्यकालीन काळात पोहोचतो. त्रिकूट शैलीतील हे मंदिर तीन गाभाऱ्यांमध्ये विभागलेले असून, मध्यवर्ती गर्भगृहात आहे श्री संगमेश्वर महादेवाचे भव्य शिवलिंग.

## विशेष वैशिष्ट्ये:

भारतातील पहिला मराठी शिलालेख इथेच आहे - सभामंडपातील तुळईवर कोरलेला.

शिलालेखात जो कोणी हा लेख वाचेल, तो विजयी होईल असे स्पष्ट वाचन.

शके ९४० (इ.स. १०१८) ची तारीख यामध्ये स्पष्टपणे नमूद.

पुरातत्व विभाग सध्या या मंदिराची जपणूक व जीर्णोद्धार करत आहे.

## विशेष शिल्पसौंदर्य:

दोन गर्भगृह - डावीकडे शिवलिंग, उजवीकडे मुरलीधर श्रीकृष्ण.

अंतराळात श्री गणेशाची मूर्ती.

छतावर: स्वर्गसुंदरी, यक्ष, गंधर्व, किन्नर, पशु-पक्षी यांची अप्रतिम शिल्पे.

मुख्य मंडपात काळभैरवनाथाची भव्य मूर्ती.

कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण, लक्ष्मी-भैरवी एकाच दगडात, व इतर अनेक कलात्मक साक्षी.

मंदिराची शिल्परचना खिद्रापूर (कोल्हापूर) येथील कोपेश्वर मंदिराशी साम्य दर्शवते.

## उत्सव आणि धार्मिक परंपरा

कुडल संगम येथे महाशिवरात्री, श्रावण महिना व मकर संक्रांती निमित्त यात्रांचे आयोजन केले जाते.

मंदिर सुधारणा समिती विविध धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भजन-कीर्तन यांचे आयोजन करते.

## अध्यात्मिक पर्यटनाचे उत्कृष्ट केंद्र

सोलापूर भिमा-सीना नद्यांच्या पवित्र संगमावर वसलेल्या पवित्र तीर्थक्षेत्र कुडल संगम (ता.दक्षिण सोलापूर) येथील संगमेश्वर आणि हरिहरेश्वर मंदिर, बहुमुखी शिवलिंगमुळे अध्यात्मिक पर्यटन स्थळ व विकसित होत आहे.

## अन्नपूर्णा देवी

संगमेश्वर मंदिरात श्री अन्नपूर्णा देवी मंदिर असून, प्रत्येक भाविक अन्नपूर्णा देवीस नैवैद्य अर्पण केल्याशिवाय पुढील कार्ये करत नाहीत. अन्न हे परब्रह्म असून, अन्नपूर्णा देवीस नैवैद्य अर्पण केल्यानंतर घरी अन्नदेवतेची कृपा राहते अशी भाविकांची श्रध्दा आहे. अन्नपूर्णा देवी संगमेश्वर मंदिराच्या प्राकार भिंतीच्या नैऋत्य बाजूस आहे.

## श्री हरिहरेश्वर मंदिर

हे महाराष्ट्रात असलेल्या प्राचीन मंदिरांपैकी एक मंदिर आहे . कल्याणीच्या चालुक्यांच्या काळात हे मंदिर इ.स.११ व्या शतकांच्या प्रारंभी ( १०१८) बांधण्यात आले. शिव व विष्णूचे एकत्रित मंदिर सोलापूर जिल्ह्यातील एकमेव आहे. मंदिराच्या बांधकामासाठी कोणत्याही सिमेंट किंवा मातीसारख्या माध्यमाचा उपयोग केलेला नाही. मुख्य मंडप, अर्ध मंडप, रंगमंडप, अंतराळ व गर्भगृह असे विभाग आहेत. असामान्य कलात्मक व भावदर्शी चेहरा व पाच शरिर असलेले स्त्रिचे शिल्प, काळ भैरव व व्याळम ुर्ती आणि कालिया मर्दन शिल्प ही या मंदिराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

श्री संगमेश्वर मंदिराच्या पायथ्याशी असलेले हे मंदिर, स्थापत्यकलेच्या दृष्टीने अचंबित करणारे आहे. १९९५ पर्यंत हे मंदिर मातीखाली गाडले गेले होते. प्रा. गजानन भिडे व ग्रामस्थांच्या प्रयत्नातून याचे उत्खनन करण्यात आले.




अमोगसिध्द मुंजे

मंद्रूप

९४२३५३५२९४


## बहुमुखी शिवलिंग

श्री हरिहरेश्वर मंदिराच्या उत्खननात मिळालेले हे एक असामान्य शिल्प असून, याचा आकार शिवलिंगासारखा असून, शिलेचा परिघ चार मिटर व वजन साडेचार टन आहे. शिल्पाच्या वरच्या मध्यापासून तळापर्यंतची उंची ११७ सेंमी आहे. या लिंगावर शिवदेवतेच्या उठाव पध्दतीने एकूण ३५९ मूर्ती कोरलेल्या आहेत. शिवमुर्ती डोक्यावर नागाचा किरीट असून, हातात त्रिशुल डमरु आहेत. ३५९ शिवमुर्ती व एकलिंग अशा ३६० शिवमुर्ती आहेत. एकदा अभिषेक केल्यावर भक्ताला वर्षभर अभिषेक करण्याचे पुण्य मिळते. ही या शिल्पामागील भूमिका आहे. भारतात किंवा जगातील शिवलिंगावर जास्तीत जास्त १२ शिवमुख कोरलेली शिवलिंगे मिळालेली आहेत. बहुमुखी शिवलिंग हे जगातील एकमेव आहे.

## कुडल संगमचा किरणोत्सव

मकर संक्रांतीच्या दिवशी, पहाटेच्या सूर्यकिरणांचा थेट स्पर्श श्री संगमेश्वर मंदिरातील शिवलिंगावर होतो.

महाराष्ट्रात फारच कमी ठिकाणी असा नयनरम्य किरणोत्सव अनुभवता येतो. या दिवशी भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असते.






## भाविकांसाठी परिवहनची सुविधा

श्रीक्षेत्र कुडल संगम येथे यात्रेसाठी भाविकांची मोठ्याप्रमाणात गर्दी होत असल्याने राज्य परिवहन व महापालिका परिवहन विभागाच्यावतीने एस.टी. आणि सीटी बसची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सोलापूर बसस्थानकावरुन सकाळी ९.१५ वाजता व संध्याकाळी ५.३० वाजता निघून रेल्वे रेल्वे स्टेशन, सात रस्ता मार्गे विजापूर रोड मार्गे अनुक्रमे सकाळी १०.३०, संध्याकाळी ७ वाजता कुडलसंगम येथे पोहचणार आहे. तर मनपा परिवहनचे राजेंद्र चौक येथून सकाळी ८ वाजता, दुपारी ३ वाजता मार्गस्थ होऊन कोंतम चौक, पांजरापोळ चौक, रेल्वे स्टेशन रंगभवन, सात रस्ता मार्गे कुडल संगम येथे पोहचणार आहे.

## पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा

- अन्नछत्र व विश्रांती गृह - देवस्थान समितीमार्फत.
- बोटिंगची सुविधा नदीत.
- शांत, आध्यात्मिक व निसर्गरम्य वातावरण - कुटुंबीयांसाठी योग्य ठिकाण.
- कुडल संगम (हत्तरसंग कुडल) हे ठिकाण केवळ एक धार्मिक स्थान नाही, तर एक जिवंत इतिहास आहे - शिल्प, श्रद्धा आणि निसर्गाचा संगम.
- आपल्या पुढच्या प्रवासात, याला नक्की भेट द्या - माणसाच्या श्रद्धेइतके सुंदर काहीच नाही!











प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास आमच्या खुप खुप शुभेच्छा..!

HONDA




कायझन होंडा
हॉटेल कामत समोर, ओल्ड एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर
अक्कलकोट रोड, सोलापूर 9579622100

तरुण भारत
जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा

दैनिक तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

## जनकल्याण
मल्टिस्टेट को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.सोलापूर

ज्योत जनकल्याणाची विश्वास समृद्धीचा

मा.राजेंद्र पी. हजारे
M.com., LLB (Gen)., GDC&A
rphajare9480@gmail.com / jankalyansolapur@gmail.com

जगजीवनदास कॉम्प्लेक्स, १४० सदर बझार, गरुड बंगल्याशेजारी, सोलापूर
मो.९८२३२३९४८०/९६२३३२९४८०

तरुण भारत
दैनिक तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



श्री. शहाजीभाऊ पवार
भाजपा : महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य

शुभेच्छुक
* यमाई कन्स्ट्रक्शन
* यमाई स्टोन क्रशर
* श्रद्धा एजन्सीज
* श्रुती एंटरप्रायझेस
* यमाई विट उद्योग
* यमाई एनर्जी प्रा.लि.
* यमाई रेडिमिक्स

यमाई उद्योग समूह, सोलापूर

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास शुभेच्छा..!

## लोकमंगल पतसंस्था
अखंड गतीतून सार्थकता
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर
मा.आ.श्री.सुभाष (बापू) देशमुख
संस्थापक अध्यक्ष - लोकमंगल समूह

महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र एकूण ७५ शाखेत कार्यरत

सांपत्तिक स्थिती : ३० जून २०२५

| तपशील | रक्कम |
|---|---|
| ठेवी | १५१७ कोटी ४७ लाख |
| कर्ज | १०४८ कोटी २८ लाख |
| भागभांडवल | ६० कोटी ५४ लाख |
| इतर निधी | ५९ कोटी ५३ लाख |
| गुंतवणूक व बँक शिल्लक | ५५८ कोटी ५९ लाख |
| संमिश्र व्यवसाय | २५६५ कोटी ७५ लाख |

ठेवीवर १०% व्याजदर

८४ महिने दामदुप्पट

सर्व प्रकारची कर्जे तात्काळ उपलब्ध

सभासदांना सर्वाधिक लाभांश देणारी पतसंस्था

लोकमंगल सुकन्या ठेव योजना
आपल्या मुलीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी १५ वर्षे दरमहा रू. ५००/- ते रू. १०,०००/- गुंतवा व १८ वर्षानंतर रू. २,५०,०००/- ते रू. ५०,००,०००/- मिळवा.

महिला सन्मान आवर्तक ठेव योजना
दरमहा रू. १००/- ते रू. ५०,०००/- पर्यंत खाते उघडता येईल.
कालावधी (मुदत) २४ महिने राहिल.
पहिला हफ्ता हा संस्था भरेल.

ज्येष्ठ नागरिक दिव्यांग व्यक्ति विधवा महिला माजी सैनिक ०.५% ज्यादा व्याजदर

फक्त मुली असलेल्या पालकांना १% ज्यादा व्याजदर

नियम व अटी लागू

तात्काळ सोने तारण कर्ज व लॉकर सुविधा उपलब्ध
संपूर्ण संगणकीकृत, कोअर बँकींग प्रणालीद्वारे कार्यरत
SMS अलर्ट व NEFT/ RTGS तसेच QR कोडची सुविधा
मोबाईल बँकिंग ॲपची सुविधा

• चेअरमन • श्री. तेली गुरण्णा अप्पाराव
• व्हा.चेअरमन • सौ. कुंभार निर्मला भागवत
• कार्यकारी संचालक • श्री. देशमुख मनीष सुभाष
• सरव्यवस्थापिका • सौ. देवडकर अलका नितीन

* समस्त संचालक मंडळ *

प्रधान कार्यालय : ९४/२९, मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर.
फोन : ०२१७-२७३५५३७, मो. ९८२३१५४५६९, ९५४५६४२५५५
lokmangalpathho@gmail.com
lokmangalpatsanstha

अधिक माहितीसाठी आमच्या जवळच्या शाखेस संपर्क करा.

प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास आमच्या खुप खुप शुभेच्छा..!

२० वर्ष यशाची, गौरवाची आणि ज्ञानदानाची...

उज्ज्वल यशाची परंपरा राखणारी सोलापुरातील अग्रगण्य ॲकॅडमी

## कामतकर क्लासेस

बदल हा आपल्याच हातात आहे...
आताच भविष्याला आकार देऊया...

- इयत्ता २ री ते १० वी सेमी इंग्रजी आणि इंग्रजी माध्यम
- इयत्ता ५ वी ते १० वी CBSE
- इयत्ता २ री, ३ री, ४ थी, ६ वी आणि ७ वी MTS
- इयत्ता ५ वी आणि ८ स्कॉलरशीप
- इयत्ता ११ वी आणि १२ वी PCMB
- CET / NEET / JEE Preparation
- इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी Foundation Course
- V.K. अकॅडमी स्पर्धा परीक्षा केंद्र : MPSC, PSI, STI, ASO. Police Bharti, SSCGD, Banking, Railway डिग्री कॉलेज ऑफ सिव्हील सर्व्हिसेस
- करिअर कौन्सिलिंग सेंटर ( Neuflex Talent Solution Pune )
- जुळे सोलापूर शाखेत विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी AC अभ्यासिका
- उत्कृष्ट निकालाची परंपरा

kamatkarclasses kamatkarclasses Web : www.kamatkarclasses.com

राजेश काथवटे 9822448830

शाखा क्र. १
कामतकर क्लासेस
जुना एम्प्लॉयमेंट चौक, कामत हॉटेल मागे, सोलापूर

शाखा क्र. २
कामतकर ॲकॅडमी
वि. मो. मेहता शाळेजवळ, जुळे सोलापूर, सोलापूर

शाखा क्र. ३
कदम सरांची सुयोग ॲकॅडमी व कामतकर ॲकॅडमी
सम्राट चौक, नीलकंठ बँकेच्या मागे, सोलापूर,
9975962000, 9970609155

कामतकर सर, मोबा. 9822448890





## कोष्टीज् फर्निचर

Mob. : 8208664524
7776914511

फक्त रु. 1,24,999/- हजार मध्ये

- कपाट
- बेड
- फोम गादी
- फोम उशी
- कुलर
- ईस्त्री
- ब्लँकेट
- टी पॉय
- बेडशीट
- टी. व्ही. ४३ इंची
- फ्रिज
- फ्रिज स्टँड
- वॉशिंग मशीन
- सोफा (३+१+१)
- सोफा कव्हर
- संपूर्ण रुकवतीचा भांडी सट



वस्तु तर सगळीकडेच मिळतात, मग कोष्टी फर्निचरचं का?
अगं! विश्वासाचं दुसरं नाव म्हणजेच ''कोष्टी फर्निचर'' ते सर्व वस्तु गॅरंटीवर मिळतात.
नवरा-नवरीच्या नवीन आयुष्याची सुरुवातीची खरेदी फक्त आणि फक्त ''कोष्टी फर्निचर'' मध्येच
फर्निचर वस्तु/ईलेक्ट्रॉनिक वस्तु/स्टिल भांडी व रुकवतीचे सामान सर्व काही
एकाच छताखाली मिळण्याचे आपल्या भागातील एकमेव शोरुम.
''कोष्टी फर्निचर''

अधिक माहितीसाठी संपर्क **कोष्टीज् फर्निचर** Mob. : 8208664524 / 7776914511

मु.पो. बेगमपूर, सोलापूर-मंगळवेढा मेन रोड, ता. मोहोळ, जि. सोलापूर - ४१३ २५३

श्री विनायक प्रिंटर्स - 90496 94311



दैनिक तरुण भारतच्या
४१ व्या वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!

## SPACE DECOR

A Division of Garuda Textiles PVT.Ltd

आमच्या इथे फायबर पॉट, बेडरूम सेट, सोफा सेट, डायनिंग टेबल, ऑफिस चेअर, ऑफिस टेबल, गार्डन साठीच्या वस्तू, लॉकर्स, आर्टीफिशल प्लॅन्टस व इतर नामवंत कंपनीचे फर्निचर उपलब्ध आहे.

**Koustubh V.Karwa**
43/23, Samrat Chowk, Solapur 413002
Ph.+91 217 2745692
garudafurniture@gmail.com



राष्ट्रीय विचाराचे दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास आमच्या खुप खुप शुभेच्छा..!

## मुळव्याध-लेसर/RF उपचार

मुळव्याध/नासुर/भगंदर/शौच्याची जागा पूर्ण बाहेर येणे

ISO-9001-2008 मान्यताप्राप्त मुळव्याधावर उपचार करणारे भारतातील पहिले हॉस्पिटल

शौच्याच्या जागी आग होणे, खाजवणे, रक्त पडणे, कोंब येणे, शौच्याची जागा पूर्ण बाहेर येणे व इतर गुदरोगावर लेसर, ड्युएल RF सह जगातील अत्याधुनिक दहा विविध प्रकारचे उपचार भारतात फक्त 'प्रॉक्टो क्लिनिक' मध्येच

डॉ. स्मिता वैद्य (M.B.B.S., M.S.) सर्जन प्रॉक्टॉलॉजीस्ट यांचे

**प्रॉक्टो क्लिनिक**


टर्शरी केअर प्रॉक्टॉलॉजी इन्स्टिट्युट

### साई सुमन हॉस्पिटल

प्लॉट नं. १०, वसंत विहार, जुना पुना नाका जवळ,
सोलापूर ४१३००१ महाराष्ट्र (भारत)
मो. 9823412144/9822709805



दै. तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !



संस्थापक अध्यक्ष

मा. जनमेजयराजे भोसले
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ

शुभेच्छुक

मा. विजयकुमार शिवय्या हंद्राळमठ
होमगार्ड समादेशक अधिकारी





दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनास

हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

मा. नगरसेविका
मेनका राठोड



सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



किंगमेकर — मा.आ.सचिनदादा कल्याणशेट्टी

किंगमेकर — मा.सुरेशजी हसापुरे

माजी उपसभापती — मा.श्रीशैल नरोळे

संचालक — मा.सुभाष पाटोळे

संचालक — मा.उदय पाटील




शुभेच्छुक

## गटसचिव संघटना, दक्षिण सोलापूर




# सच्चिदानंद मठातील यजुर्वेदाची परंपरा

**सोलापूर जिल्ह्याला अत्यंत मोठी सांस्कृतिक, साहित्यिक,धार्मिक परंपरा लाभली असून इथे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. त्यामध्ये सोलापूर येथील गणपती घाटावरील सविस्तर परंपरेची माहिती प्रस्तुत करीत आहे.**

सोलापूरमधील गणपती घाटावरील श्री सिद्धिविनायकाच्या मूर्तीकडे चेहरा करून उभे राहिले असता डाव्या हाताला सिद्धरामेश्वरांचे मंदिर व सुंदर ,भव्य, पवित्र असा सिद्धेश्वर तलाव दिसतो. उजव्या हाताला प्रसन्न मूर्ती असलेले दत्त मंदिर त्याच्यासमोर लक्ष्मी नारायण वृक्षाचा पार (पिंपळ व लिंब )त्या पारावर छोटेसे मारुतीचे मंदिर त्याच्याच बाजूला श्री सच्चिदानंद स्वामींचा मठ आहे अत्यंत चैतन्यमय असलेले ठिकाण ते माझे आजोळ ,मामाचे घर आहे .त्यामुळे त्याचा मला आनंद वाटतो.

गणपती घाटावरील जागा ही संतांच्या चरणस्पर्शाने पुनीत झाली आहे .ते म्हणजे सच्चिदानंद स्वामी होय . ते मूळचे सिंदफळ या गावचे जिल्हा (धाराशिव) त्यांचे पुर्वा श्रमीचे नाव शंकर भटजी असे होते. हे शुक्ल यजुर्वेद माध्यदिन वाजसनेय शाखेचे होते. व शुक्ल यजुर्वेदात अत्यंत निष्णात होते. कारण श्री शुक्ल यजुर्वेदाचे मंत्र जे सुर्यनारायनांनी श्रीमत योगेश्वर याज्ञवलक्यांना शिकविले.तेच मंत्र त्यांचे (श्री सच्चिदानंद स्वामींचे गुरू श्री सखाहरी दादेगावकर राहणार श्रीक्षेत्र तुळजापूर यांनी सच्चिदानंद स्वामींना शिकवले. श्री सखाहरी महाराजांप्रमाणे श्री सचिदानंद स्वामी वेदाभ्यासात नावलौकिक प्राप्त करू लागले.मध्ये अभ्यासू लागले. शके. १८१५ पासून ते सोलापुरातील जुने विठ्ठल मंदिरात वास्तव्यास होते. त्यानंतर पुढे शके १८४० पासून गणपती घाटावरील दत्त श्री दत्त मंदिरात वास्तव्यास होते. सोलापुरी आल्यावर त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना वेदाध्ययन करण्यास शिकविले. फक्त वेदाभ्यास करायला शिकवले नाही तर एकाहून एक विद्वान घना पाटी शिष्य तयार केले. अशा प्रकारे शिष्यच नव्हे तर गुरु शिष्य परंपरा वैदिक समाजात तयार केली. त्यांच्या अनेक शिष्यांमधील पट्ट शिष्य येथे राहत होते ते एक पट्टशिष्य म्हणजे कै चंद्रशेखर शिरसीकर त्यांचे कुटुंब आजही तिथे वास्तवास असून श्री सच्चिदानंद स्वामींची,व सेवा करीत आहेत .

स्वामींनी श्री शुक्ल यजुर्वेद अखंड पारायण सप्ताहाची सुरुवात केली. तो सप्ताह आषाढ शुद्ध नवमी ते आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा पर्यंत चालतो. त्यांच्या शिष्यवर्गांनी चैत्र शुद्ध पौर्णिमा ते वैशाख शुद्ध पौर्णिमा पर्यंत रोज रात्री आठ वाजता वसंत पूजा सुरू केली. कारण चैत्रशुद्ध १५ हा श्री सच्चिदानंद स्वामींचा जन्मदिवस होय .

स्वामींचे पट्ट शिष्य चंद्रशेखर शिरसीकर यांनी त्यांच्या हयातवर आपल्या गुरूंचे कार्य नेटाने पुढे चालविले .शिष्य परंपरा तयार केली. गुरूंनी सुरू केलेल्या सांप्रदाय वाढविला. एवढेच नव्हे तर श्री सच्चिदानंद स्वामींची पुण्यतिथी अनेक लहान-मोठे यज्ञ या इत्यादी अनेक व्रते अनुष्ठाने गरीब बटूंचे उपनयन संस्कार शालेय शिक्षण इत्यादी जेवढे शक्य होईल तेवढे सर्व केले. अखंडपणे सेवा केली.

यात प्रामुख्याने सांगावे वाटते ते म्हणजे भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहेअसे म्हणणारे अक्कलकोटचे स्वामी समर्थांच्या चरणस्पर्शाने पावन झालेली ही वास्तू आहे.कारण ते इथे वास्तव्यास होते. त्या वेळेसची घटना नमूद करावी वाटते. त्यावेळी मोठा दुष्काळ पडला होता .तेव्हा सर्व गावकरी चिंतेत होते. मग ते स्वामी समर्थांकडे आले. त्यांना विनविले पाऊसपाणी नाही. सर्वत्र दुष्काळाचे सावट आहे वगैरे सांगितले .त्यावर स्वामींनी आकाशाकडे पाहिले आणि जोरदार वरुणराजाचे आगमन झाले. सिद्धेश्वर तलाव पाण्याने तुडुंब भरला असे सांगितले जाते.




वंदना कुलकर्णी

सोलापूर

९६५७०९५८६२


सोलापुरात कोणत्याही पिठाचे श्रीमद जगद्गुरु शंकराचार्यांचे आगमन ज्या ज्या वेळी होईल त्या त्यावेळी गणपती घाटावर त्यांची पाद्यपूजा करून श्री सचिदानंद स्वामींचे पट्ट शिष्य चंद्रशेखर दादा शिरसीकर यांचा आशीर्वाद घेत त्यांचा आशीर्वाद घेत व वेदपाठ शाळेचे कार्य दाखवीत . त्यांनाही श्रीमत शंकराचार्यांना संतोष वाटून आशीर्वाद देत. असेच एकदा शारदा पीठाचे शंकराचार्य खरे स्वामी गणपती घाटावर आले असताना त्यांनी चंद्रशेखर यांचे कार्य पाहून वैदिक धर्मावरील भक्ती व आर्य धर्माचा जाज्वल अभिमान पाहून कै चंद्रशेखर यांना वेदभूषण ही पदवी दिली.अजूनही गणपती घाटावर अक्कलकोटच्या गजानन महाराजांचे आगमन दरवर्षी होते व थाटामाटात पुजा संपून होते.

अशा अनेक थोर संतांच्या चरणस्पर्शाने पुनित झालेल्या गणपती घाटावरील पवित्र जागेत अनेक यज्ञ झाले आहेत.मठात अनेक धार्मिक कार्यक्रम सतत चालू असतात . आजपर्यंत अनेक यज्ञयाग झाले आहेत. त्यापैकीं प्रमुख महारुद्र स्वाहाकारण,पंचकुंडी गायत्री स्वाहाकार, सहस्त्रचंडी स्वाहाकार ,गणेशयाग, विश्वशांती याग ,विष्णू याग, कोटी लिंगार्चन इत्यादी याग झाले आहेत. शिवाय श्री शुक्ल यजुर्वेदाची हजारो पारायण श्रीमत भागवत सप्ताह ,गुरुचरित्र पारायण असे अनेक कार्यक्रम वर्गणी गोळा न करता प्राप्त होतात.सप्ताहास १०० वर्ष पूर्ण झाली म्हणून खुप मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा झाला.त्यानिमितानेे एक पुस्तक प्रकाशित झाले आहे.त्यामध्ये अनेकजणांनी लेख लिहिले आहेत

सच्चिदानंद स्वामी यांच्यानंतर त्यांचे पट्टशिष्य परंपरेस सुरुवात केली. त्यांचे अनेक शिष्य मुळज,मुगळी, उमरगा ,औसा तसेच मराठवाड्यातील गावात आहेत.ते सर्वजण अखंड वेदसप्ताहास सांसारिक व इतरही अडचणी बाजूला सारून आवर्जून सोलापूरी येतात. सात दिवस मुक्काम करतात.तसेच ज्योतिष्याच्या अभ्यासात अनेक पट्ट शिष्य तयार केले आहेत. व्यास पौर्णिमा ,गुरू पौर्णीमा सप्त चिरंजीव पैकी एक व्यास यांचा जन्म दिवस आहे.

यजुर्वेदाचे ज्ञानपीठ स्थापन करून यजुर्वेद अध्ययनास प्रारंभ केला.व आषाढ नवमी ते पौर्णिमेस वेदाची सेवा करायची असे शिष्यगणांना सांगितले . २४ तास अखंड पारायण चालू असते .तीन, तीन तासाचा पर्याय असतो . माधुकरीची परंपरा आहे. पौर्णिमेस विश्व कल्याण, जन कल्याण, भक्त कल्याण, गुरूकृपा आशिर्वाद संकल्प करून यजुर्वेद सरस्वती पूजन, व्यास पूजन करून, महानैवेद्य होतो. महाआरती व त्यानंतर महाप्रसाद वाटप होतो. अनेक भक्तगण प्रसादाचा लाभ घेतात. यामध्ये भिक्षेच्या आमटीचे अत्यंत महत्व आहे. याबद्दल थोडे सांगते की अखंड श्री शुक्ल यजुर्वेद पारायण सप्ताहात रोज सच्चिदानंद स्वामी भक्तांकडे माधुकरी (भिक्षा) मागितली जाते. माधुकरी सुवासिनींनी स्वयंपाकात केलेल्या पदार्थांचा नैवेद्य सच्चिदानंद शिष्यगण घरोघरी जाऊन =ख भवती भिक्षां देही अशी आरोळी देऊन तो नैवेद्य घेतात .माधुकरी घेताना पोळी भात, शिरा, साखरभात, तळलेले पदार्थ, भिक्षेच्या झोळीत घेतात चटणी कोशिंबीर, लोणच, पातळभाजी, कोरडी भाजी एकाच स्टीलच्या मोठ्या कडीच्या डब्यात घेतले जातात. मठात आल्यावर घरचा नैवेद्य, आणि भिक्षेचा नैवेद्य स्वामींना दाखवला जातो.




सगळ्यांनी भक्तीने व श्रध्देने केलेला हा गोपाळकाला आणी आमटीला भिक्षेची आमटी संज्ञा पडली .व नंतर संध्याकाळी ८ वाजता स्वामींच्या मंडपात नारदीय कीर्तन संपन्न होते. आशिर्वचनाने सांगता होते. सप्ताहभर हे अन्नग्रहण केल्यावर एका वर्षाची तृप्ती होते. भक्तगण पुढच्या अखंड यजुर्वेद पारायण सप्ताहाची आतुरतेने वाट पहातात. परंतु हे सर्व करतात गणपती घाटावर वास्तव्यास असणारे वेदमूर्ती श्री व सौ वैभव शिरसीकर, चैतन्य शिरसीकर,जोशी आणि सांगवीकर परिवार व ब्रह्मवृंद शिष्य यांचे मोलाचे सहकार्य लाभते.इतकी सर्व व्यवस्था करणे अवघड असते पण ते अत्यंत चोखपणे करतात. हा लेख शब्दबध्द करण्यासाठी मला सौ वसुधा सुवर्णपाठकी व वेदमूर्ती ऋषीदेव दादेगावकर यांचे लेखास सहकार्य लाभले.

सप्ताहभर हे अन्नग्रहण केल्यावर एका वर्षाची तृप्ती होते. भक्तगण पुढच्या अखंड यजुर्वेद पारायण सप्ताहाची आतुरतेने वाट पहातात. पण समाधी कशी घेतली ते सांगणे महत्वाचे आहे. शके १८४९ अश्विन शुद्ध सप्तमी सोमवार रोजी सकाळी स्वामींची प्रकृती चिंताजनक झाली. सर्व शिष्य मंडळी जमली .स्वामींनी शिष्यांना, भक्तांना, समाधीच्या तयारीला लागा असे सांगितले. व त्यांचे पट्ट शिष्य कै. चंद्रशेखर शिरसीकर माझ्या आजोबांना त्यांना स्वामींनी सांगितले आता सर्वच पहा. आता तू सर्वच पहा संपर्क वाढव असे सांगितले व त्यांच्याच मांडीवर सकाळी ११ वाजून पंधरा मिनिटांनी नारायण नारायण म्हणत देह ठेवला पुढे स्वामींची समाधी बांधण्यासाठी केली कलेक्टर यांनी सिटी मॅजिस्ट्रेट यांनी परवानगी दिल्यावरच चार वाजता सोलापूर शहरातून श्री स्वामींची भव्य मिरवणूक काढून रात्री आठ वाजता त्याच मोठ्या समाधीचे काम पूर्ण केले स्वामींचे पट्ट शिष्य चंद्रशेखर शीर्षीकर यांनी त्यांच्या हयातवर आपल्या गुरूंचे कार्य आपल्या गुरूंचे कार्य नेटाने पुढे चालविले. शिष्य परंपरा तयार केली. गुरूंनी सुरू केलेल्या सांप्रदाय वाढविला. एवढेच नव्हे तर श्री सच्चिदानंद स्वामींची पुण्यतिथी अनेक लहान-मोठे यज्ञ या इत्यादी अनेक व्रते, अनुष्ठाने, गरीब बटूंचे उपनयन संस्कार, शालेय शिक्षण इत्यादी जेवढे शक्य होईल तेवढे सर्व केले. आजही गणपती घाटावर गुरुपौर्णिमा चा उत्सव थाटात संपन्न होतात. अनेक भक्तगण सोलापूर शहरातून,परगावहून येतात. ब्रह्मवृंद सात दिवस मुक्काम करतात व भक्ती भावनेने दर्शन घेतात. स्वामी भक्तगणास आशीर्वाद देतात. तो आशीर्वाद लाखमोलाचा असतो.

# मंगळवेढे संत भूमीतील उपेक्षित धार्मिक स्थळे



जगतज्योती महात्मा बसवेश्वर

**भागवत धर्माचे आद्यपीठ आणि दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या देवनगरी पंढरीपासून दक्षिणेस पंचवीस किलो मीटर अंतरावर संतांची नगरी मंगळवेढे स्थित असून या पुण्य पवित्र भूमीत अनेक साधुसंतांचे जन्म झाले आणि काही संत येथे वास्तव्यास होते.अशा या संतांच्या भूमीमध्ये संतांच्या शिकवणीने मंगळवेढा भूमीला सुसंस्काराची व धार्मिकतेची जडणघडण झालेली आहे.सर्व जाती-धर्माचे लोक एकत्र येऊन सण उत्सव यात्रा जत्रा गुण्यागोविंदाने साजऱ्या करतात मात्र या संतभूमीतील अनेक संतांचे मंदिरे दुर्लक्षित आहेत. त्यामुळे संतांच्या या धार्मिक भूमीची उपेक्षा होत असल्याची खंत अनेकांना होत आहे. धार्मिकतेचा वारसा सांगणाऱ्या गौरवशाली महाराष्ट्रात सर्वाधिक संत असलेली मंगळवेढे ही संतांची पुण्यभूमी याच भूमीला राजकीय व सामाजिक अनस्तेमुळे ही संत भूमी दुर्लक्षित राहिलेली आहे, संतांची ही भूमी पर्यटन स्थळ झाले पाहिजे यासाठी मंगळवेढ्याच्या अनेक संतांची मंदिरे पुनर्निर्मित झाली पाहिजेत एवढाच धार्मिक अट्टाहास.**

दामाजी पंतांचा मंगळवेढा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या नगरीमध्ये दामाजी संस्थेने दामाजी मंदिर व सभा मंडप उभारणीचे काम वेगाने चालू केलेले असून अलीकडच्या स्वतंत्र उत्तर कालावधीत एक भव्य धार्मिक स्थळ उभारणीचे हे सर्वात मोठे व ऐतिहासिक संत स्मारक होणार आहे. परंतु याच संत नगरी मध्ये संत चोखोबा,संत कानोपात्रा, संत गोपाबाई,संत मोहिनी बुवा, टीकाचार्य, सिताराम महाराज, कल्याण साहेब,महात्मा बसवेश्वर अशा अनेक संतांच्या मंदिराचे अस्तित्व संपुष्टात येऊ लागले आहे. पांडुरंगाचा लाडका भक्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत चोखोबाचे स्मारक अनेक वर्षापासून प्रलंबित आहे.संत चोखोबाचे स्मारक झाल्यास त्याच ठिकाणी संत कर्ममेळा,संत सोयराबाई, संत निर्मळा,व संत बँका या एकाच कुटुंबातील संतांची स्मारके एकत्र येतील आणि ज्या संतांनी लोकांना आपल्या अभंगातून केलेली जनजागृती याचे अस्तित्व राहील यासाठी चोखोबा स्मारक होणे अपेक्षित आहे.

ज्या संत महात्म्याने समतेची क्रांतिकारक चळवळ उभी केली, धर्माची कवाडे सर्वांसाठी खुली केली आणि मानवता वादाचे प्रेरक म्हणून ज्या महात्मा बसवेश्वरांनी समतेची शिकवण दिली त्यांचे स्मारक निर्माण होणे अपेक्षित आहे. मंगळवेढ्याला वास्तव्यास राहून समतेची शिकवण देणारे महात्मा बसवेश्वर यांच्या स्मारकासाठी कृषी खात्याच्या जागे बाबतचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता मात्र आत्ता मंगळवेढ्याचे लोकप्रतिनिधी आमदार समाधान आवताडे व पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कृष्ण तलावातील जागा निश्चित झाल्याचा निर्णय मंत्रिमंडळात घेतल्याने या स्मारकास निधी मिळताच हे स्मारक लवकरच उभे राहील अशी अपेक्षा पल्लवीत



झालेली आहे.तसेच मंगळवेढ्याच्या सात्विक व समृद्ध आणि पवित्र भूमीला ज्या कान्होपात्रेने स्त्रीत्वाचा स्वाभिमान जागा ठेवून संत संग हाच जीवनाचा आधार असल्याची शिकवण व वारसा मंगळवेढेकरांना दिला आणि पांडुरंग चरणी आपला देह अर्पण केला अशा मंगळवेढ्याच्या सुवर्णकन्या कान्होपात्रेचे चे मंदिर हे दुर्लक्षित आहे एवढेच नव्हे तर या मंदिरासाठी आवश्यक असलेल्या छोट्याशा जागेची मालमत्ता सनद देखील नगरपालिकेच्याकडे दप्तरी नाही. एक सामाजिक बांधिलकी म्हणून शनिवार पेठेतील राहीबाई कवडे यांनी स्वखर्चाने एक छोटेसे कान्होपात्रेचे मंदिर गेल्या पन्नास वर्षापूर्वी बांधलेले असून सध्या डांगे कुटुंबीय या छोट्याशा मंदिराची देखभाल करीत आहेत.अन्यथा संत कान्होपात्रेचे अस्तित्व देखील राहिले नसते.तसेच तेराव्या शतकात दुष्काळ पडलेला असताना पाण्यासाठी विहीर खोदताना विहिरीला पाणी लागत नसल्याने कासार समाजाची सून गोपाबाईने त्या विहिरीत आपले आत्मसमर्पण केले व मंगळवेढेकरांची पाण्याची तहान भागविली. आपले जीवन अजरामर केले अशा गोपाबाईचे स्मारक त्यास गोपाबाई विहिरीजवळ होणे अपेक्षित आहे.तसेच मंगळवेढ्याच्या शहराच्या मध्य ठिकाणी ज्या मोहिनीबुवाने दुष्काळातून सावरण्यासाठी पांडुरंगाला याचना करून व मौन व्रत धारण करून मंगळवेढ्याची जनता अन्नधान्य वाचून भुकेली होती त्यांच्या मौनव्रताने मंगळवेढा धनधान्याने समृद्ध झाला त्या मोहिनीबुवाचे जुन्या मंदिराची पुनर्बांधणी होणे अपेक्षित आहे..

याच मंगळवेढामध्ये स्वराज्याचे संस्थापक रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा एक दिवसाच्या मुक्कामाने मंगळवेढ्याची माती पुण्यवान झाली. मिर्झाराजे जयसिंग यांनी शिवाजी महाराजांची भेट ज्या ठिकाणी झाली तो भुईकोट किल्ला गेल्या ९०० वर्षापासून






बाळासाहेब नागणे

मंगळवेढा

९७६३२३७७०७


कोणतीही डागडूजी न करता अभेद्य उभा आहे.त्याची पुनर्बांधणी करून मूर्त रूप मिळाल्यास मंगळवेढ्याचा ऐतिहासिक वारसा जपला जाईल. याच किल्ल्याच्या पाठीमागे काशी विश्वेश्वराचे मंदिर अत्यंत कलाकुसरीचे व देखणे असून भव्य कोरीव काम बांधकाम प्राचीन कलाकुसरीचा एक उत्कृष्ट नमुना मानला जातो मात्र या मंदिराच्या व कोरीव शिखराच्या रंगरंगोटीचे काम आज पर्यंत केव्हाही झालेले नसून या मंदिराच्या भोवती देखणी संरक्षक भिंत बांधकाम झाल्यास या मंदिराला वैभव प्राप्त होईल अशी सार्थ अपेक्षा.याच मंदिरा शेजारी असणारी ऐतिहासिक महादेव विहिरीची पुनर्बांधणी होणे व त्यामध्ये असलेल्या दुर्मिळ ब्रह्मदेवाच्या मूर्तीचे स्वतंत्र मंदिर होणे अपेक्षित आहे. काशी विश्वेश्वराच्या मंदिराच्या पश्चिमेस कृष्ण तलाव असून या तलावामध्ये दक्षिणेचा राजा कृष्णदेवराय यांनी याच तळ्यात कृष्णाचे मंदिर बांधलेले पुरावे सापडतात मात्र हे मंदिर शेकडो वर्षे तलावाच्या पाण्यात अदृश्य झाल्याने त्याची पडझड होऊन केवळ अवशेष पहावयास मिळतात या मंदिरामध्ये चतुर्मुख शिवलिंग सापडलेले आहे. तलावातील श्रीकृष्ण मंदिर पुन्हा उभारल्यास मंगळवेढ्याच्या पर्यटनाला अधिक चालना मिळेल. अशी सार्थ अपेक्षा. मंगळवेढा शहराच्या खंडोबा गल्लीतील ऐतिहासिक देशपांडे वाड्यात जय तीर्थ टीकाचार्य यांचे जन्मस्थळ असून मंगळवेढ्याच्या ऐतिहासिक लेखन परंपरेत





टिकाचार्यांनी मोलाची कामगिरी केलेली होती.बाराशे वर्षांपूर्वीचा हा देशपांडे वाडा टीकाचार्यांचे जन्म स्थळ असून या वाड्याची पुनर्बांधणी होऊन टीकाचार्यांचे स्मारक उभारले जावे ही सार्थ अपेक्षा.

वरील मंगळवेढ्यातील दुर्लक्षित मंदिराबरोबरच मंगळवेढ्याचे ग्रामदैवत गैबीपीर, लतीबुवा, सिताराम महाराज, कल्याण साहेब, स्वामी समर्थ अक्कलकोटकर महाराज, संत गोविंद बुवा,संत वडरी महाराज,संत आर्वीकर महाराज, संत सेना महाराज, या आणि अशा अनेक संतभूमीचा वारसा सांगणाऱ्या संतांची धार्मिक मंदिरे आणि अशा धार्मिक स्थळांची जपणूक होणे अपेक्षित आहे.यासाठी राजकीय अस्ता आणि सामाजिक बांधिलकी जोपासणे अपेक्षित आहे यामुळे मंगळवेढ्याची संतभूमी धार्मिकतेचे पर्यटन स्थळ व्हावे आणि मंगळवेढ्याची संतभूमी नावारूपाला यावी हीच मंगळवेढेकरांची सार्थ अपेक्षा!!. राम कृष्ण हरी!!







ब्रम्हांडनायक



भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे

***श्री** स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ/२२७९) अक्कलकोट या धर्मादाय न्यासाच्या कार्याची माहिती स्वामींचे भक्त संपूर्ण भारतभरातून अक्कलकोट येथे दर्शनासाठी येतात. काळानुरूप भक्त मंडळींच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होते आहे. १९८८ पासून आज पर्यंत स्वामी समर्थांच्या अन्नछत्र मंडळात अनेक वैशिष्टयपूर्ण बदल घडले आहेत. पण या सर्व भक्तमंडळींना अन्नपूर्णे सदा पूर्णे शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिध्यर्थं भिक्षान् देहीच पार्वती या श्र्लोकाची प्रचिती अन्नपूर्णेच्या रूपात देत, स्वामींच्या कृपा प्रसादाचा लाभ मिळवून दिला आणि अन्नदानाच्या या महाचळवळीचा पाया रचला तो श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने. १९८८ पासून अतिशय पुण्याचं पण तेवढंच आव्हानात्मक व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे काम अक्कलकोट संस्थानच्या राजघराण्याचा वारसा लाभलेले संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष सन्मा. श्री. अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहे.*





# अन्नपूर्णे सदा पूर्णे शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिध्यर्थं भिक्षान् देहीच पार्वती

**श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासच्या या स्वामी कार्यावर टाकलेला हा एक दृष्टिक्षेप**

वास्तविक, अक्कलकोट संस्थानच्या भोसले घराण्यावर श्री स्वामी समर्थ महाराजांची खास मर्जी होती आणि असीम कृपा होती. श्री स्वामी समर्थांच्या समकालीन त्यावेळेस श्रीमंत मालोजीराजे दुसरे हे गादीवर होते ते निस्सीम स्वामीभक्त होते. स्वामी भक्तीची परंपरा नंतरच्या काळात राजघराण्यात रुजत गेली आणि या राजघराण्याचा वारसा लाभलेले सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांचे करवी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना करून परगांवच्या स्वामी भक्तांसाठी अन्नदान हे सर्वश्रेष्ठ असे स्वामी कार्य श्री स्वामी समर्थांनी सुरु केले. स्वामी सेवेचा ध्यास आणि अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी या उद्देशाने, गुरूपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर सन १९८८ मध्ये सन्माननिय श्री. जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प. पू. श्री. मोहन पुजारी आणि आपल्या इतर सहकार्यांच्या सहयोगाने, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या धर्मादाय न्यासाची मुहूर्तमेढ रोवली. अन्नछत्राच्या उभारणी वेळी संस्थापक अध्यक्ष सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रथमतः ३ किलो तांदळाचा प्रसाद स्वामींना महानैवेद्य म्हणून दाखवला, भाविकांना महाप्रसाद दिला आणि अन्नछत्र मंडळाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या धर्मादाय संस्थेचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यानंतर, सार्वजनिक धर्मादाय न्यास अस्तित्वात आले.

कै.अंबुबाई सरदेशमुख या मातोश्रींनी उदार अंत:करणाने वटवृक्ष मंदिराच्या उत्तर महाव्दारालगत स्वत:च्या जागेत अन्नछत्र सुरू करण्यास परवानगी दिली. सुरवातीला अगदी लहान स्वरूपात हे कार्य सुरू होते. पण दिवसेंदिवस स्वामी भक्तांची वाढणारी गर्दी लक्षात घेता, या धर्मादाय न्यासाने देवस्थानच्या दक्षिण बाजूस कै.वीरभद्र कोळ्ळे यांच्या मालकीच्या जागेची रीतसर खरेदी करून, त्या जागेवर नियोजनपूर्वक मोठे पत्राशेड उभारून सन १९९४ मध्ये अन्नछत्राचा कार्य विस्तार केला. सध्याचे अन्नछत्र हे प्रशस्त आणि वातानुकूलित आहे. अनेक स्वामी भक्तांनी या पुण्यकार्यात सढळ हस्ते देणग्या दिल्या. देणग्यांचा ओघ ही वाढला आणि आजही तो सुरु आहे. सुरवातीच्या काळात एस.टी.महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सढळ हाताने मदत करून या कार्यास हातभार लावला. तसेच सोलापूरचे कै.बाळासाहेब शिंदे व कै.शिवाजीराव पिसे महाराज यांनी या कार्यासाठी खंबीर साथ दिली. त्याचप्रमाणे ॲड.मा. श्री.सुरेशचंद्र भोसले, पुणे आणि सन्मा. ॲड.श्री नितीनजी हबीब यांनी या स्वामी कार्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत मोलाची साथ दिली आहे.

स्वामी भक्तांचे व शहरवासी यांचे श्रध्देचे स्थान असलेल्या शमी विघ्नेश गणेशाची स्थापना १९९२ साली 'यात्रीभुवन' समोर शमीच्या विशाल वृक्षाखाली करून सुंदर असे मंदिर त्या ठिकाणी उभारलेले आहे .या गणेशाची नित्योपचार व पूजा होत असून येथे श्री गणेश जयंती व श्री गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

सर्व स्वामी सेवेकऱ्यांच्या सहकार्याने, अन्नछत्र मंडळाचे कार्य आजतागायत अविरतपणे सुरू आहे. आजमितीस श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दररोज दोन्ही वेळेस १५ ते २० हजारांवर स्वामीभक्त, महाप्रसादाचा लाभ घेऊन तृप्त होतात. उत्तम नियोजन, भक्तांच्या गर्दीचे सुयोग्य व्यवस्थापन, महाप्रसादासाठी गुणवत्तापूर्ण अन्नधान्याचा व भाजीपाल्याचा वापर करण्याची दक्षता घेतली जाते तसेच सर्व गुणवत्ता मानकांची काळजीपूर्वक अंमलबजावणी ही केली जाते. तसेच वॉटर सॉफ्टनर च्या माध्यमातून भक्तांना क्षार विरहित व आर. ओ. चे पिण्याचे पाणी दिले जाते. दररोज केल्या जाणाऱ्या महाप्रसादात पोळी, मसालेभात, शिरा किंवा गव्हाची खीर, सांजा, आमटी, बटाटा- वांगी - काकडी भाजी, पालेभाज्या, पापड तर रात्री साधाभात,पोळी,भाजी,आमटी असे प्रसादाचे स्वरूप असते. एकादशीच्या दिवशी साबुदाणा खिचडी, दही, भगर, आमटी, खजूर, केळी असे उपवासाचे पदार्थ असतात. दररोज सकाळी ठीक ११.३० वा. मंदिरात अतिथी व मान्यवर देणगीदारांच्या हस्ते स्वामींना महानैवेद्य दाखवून, अन्नछत्रात महाआरती व संकल्प पार पडतात. यानंतर सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद दिला जातो. यासाठी अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांची प्रमाणपत्र आयएसओ मूल्यांकन प्रमाणपत्र व भारत सरकारचे भोग प्रमाणपत्र ही मिळालेले आहे. येथे सुमारे ३०० सेवेकरी असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालतो.

परगावच्या स्वामी भक्तांच्या निवासाच्या दृष्टीने यात्री निवास, यात्री भुवन ,अतिथी , गणेश मंदिर यात्री थांबा या निवासी इमारती बांधल्या असून यामध्ये स्वामी भक्तांना सोयी सुविधा देऊ केल्या आहेत .यात्री निवास ही भव्य इमारत २००३ पासून पासून स्वामी भक्तांच्या सेवेत रुजू झालेली आहे या इमारतीमध्ये मिनी हॉल सह कॉमन ६६ खोल्या असून १४ मोठे हॉल आहेत पैकी दहा हॉलमध्ये बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये सुमारे २००० भक्त निवासाला थांबू शकतील इतकी क्षमता आहे . यात्री भुवन या इमारतीत नॉन एसी सुट आणि एसी सुट तसेच डीलक्स एसी सुटस आहेत. सदर इमारतीत सुमारे ५०० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता . आहे गणेश मंदिर यात्री थांबा या इमारतीत एकूण बारा एसी सुट असून सुमारे ५० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे. अतिथी निवास ही इमारत सुद्धा एसी असून येथे सुद्धा ५० भक्त विश्रांतीस राहू शकतील इतकी क्षमता आहे त्याचप्रमाणे स्वतंत्र पलंग व्यवस्था सुरू असून याची क्षमता ६१ इतकी आहे या सर्व इमारतीत लिफ्ट यंत्रणा कार्यान्वित असून अग्निशमन यंत्रणा सुद्धा बसविलेली आहे. सद्यस्थितीत अन्नछत्र मंडळाच्या परिसरात प्रशस्त आणि भव्य असे ८ एकरातील वाहनतळ, वाहनतळ शेड तसेच २९० के. वी. क्षमतेचा सोलर प्रकल्प कार्यान्वित आहे. अन्नछत्रामध्ये संस्थापक अध्यक्ष सन्मा.श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी स्वतः पुढाकार घेऊन सागवानी व उत्तम कलाकुसर केलेला असा स्वामींचा रथ केला असून हा रथ प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी वेळेस ७ दिवस पहाटे वेळेस शहरातून नगर प्रदक्षिणेस निघत असतो.



कुस्तीगिरांना अन्नछत्र मंडळाकडून खुराक किट वाटप.

भोसले घराण्याशी असलेले जुना ऋणानुबंध जपत भारतरत्न, गानसम्राज्ञी,आदरणीय लतादीदी मंगेशकर यांनी त्यांच्या वापरात असलेली दोन वाहने भेट म्हणून देऊ केलेली आहेत. न्यासाने मंडळाच्या परिसरामध्ये ती वाहने जतन करून ठेवलेली आपल्याला पाहायला मिळतात.

महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहास दर्शन घडवणारे शिव चरित्र, धातुशिल्प प्रदर्शन भक्तांना पाहण्यासाठी उभारण्यात आले आहे. भारतरत्न गानसमाज्ञी आदरणीय लतादिदी मंगेशकर यांचेही मार्गदर्शन वेळोवेळी या न्यासास लाभलेले आहे. गडकिल्ले सृष्टी ही त्यांच्याच संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. अतिथी निवासाजवळ स्वामींची महती भक्तांना कळण्यासाठी श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र भित्ती शिल्प साकारण्यात आले आहे.

अतिशय निसर्गरम्य वातावरणात सुशोभित आणि हिरवळीने नटलेल्या या आवारात श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोद्यान सर्वांचेच लक्ष वेधून घेतात.

न्यासाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रतिवर्षी भव्य प्रमाणात आयोजित करण्यात येणारे गुरुपौर्णिमा आणि वर्धापन दिन हा महोत्सव. या १० दिवसिय धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रामधील दिग्गज प्रवचन- कीर्तनकार, गायक कलाकार आपली सेवा स्वामींच्या चरणी रुजू करतात. त्याचप्रमाणे १९८८ पासून स्वामी दर्शनास, उत्सवास व कार्यक्रमाच्या निमित्त्य अन्नछत्रास वेळोवेळी सदिच्छा भेट देऊन व मार्गदर्शन करणाऱ्या दिग्गज मंडळी, मान्यवर व सन्मा.देणगीदार यांनी न्यासाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने, प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, गोवा, कर्नाटक या राज्यातील स्वामी भक्तांना या माध्यमातून स्वामींच्या दर्शनाचा लाभ अन्नछत्र मंडळाच्या वतीने देण्यात येतो. सन १९९८ पासून ही पालखी परिक्रमा अखंडितपणे सुरू आहे.



**शामराव शिवराम मोरे**
सचिव,
श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट

अन्नदानाच्या या पवित्र कार्याबरोबरच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने अनेक सामाजिक कार्यांना हातभार लावला गेला आहे आणि या माध्यमातून लोकाभिमुख अशा कामांना, कायमच प्राधान्य दिले जाते. त्या समाजोपयोगी कार्याचा हा आढावा

१९९३ च्या किल्लारीच्या महाविनाशकारी भुकंपाच्या वेळेस या न्यासाने सलग एक महिना दररोज ट्रक भरून अन्नवाटप केलेले आहे. सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत या न्यासाने अक्कलकोट शहर विकास कार्यासाठी मोठे योगदान दिले आहे. स्वमालकीच्या जमिनीपैकी ४ १/२ एकर जागा मुस्लीम कब्रस्तानास, ३ एकर जागा लिंगायत स्मशानभूमीसाठी आणि ११/२ एकर जागा बाह्यवळण रस्त्यास तसेच भक्तांच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाकरीता मुस्लिम कब्रस्तानाजवळ स्वमालकीची जागा नगरपरिषदेस दिली आहे .

८ कि.मी. अंतरावर असलेल्या गळोरगी येथील स्वमालकीच्या विहीरीतून ५ कोटी खर्चून अन्नछत्रासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना केली आहे, तसेच वटवृक्ष देवस्थानाससुध्दा पाणी देऊ केले आहे. २०१४ मध्ये उद्भवलेल्या तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये अन्नछत्र मंडळाच्या वतीने, गळोरगी येथील स्व-मालकीच्या विहिरीतून पाईप लाईनव्दारे पाणी आणून सलग बारा महिने दररोज १२ लाख ५० हजार लिटर पाणी अक्कलकोट नगर परिषदेस देण्यात आले.

हे न्यास भूकंपग्रस, जळीतग्रस्त , पूरग्रस्तांना तातडीने मदतीचा हात पुढे करते तसेच गरिब व गरजवंताना शैक्षणिक व वैद्यकीय मदत करते. ऑगस्ट २०१९ ला कोल्हापुर व सांगली तसेच डिसेंबर २०२१ ला चिपळूण येथील पुरग्रस्तांना तातडीने जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य शिधा वाटप करून, आपलं योगदान दिले आहे. सर्व सण ,उत्सव व इलेक्शन ड्युटीस कार्यरत असणारे सर्व शासकीय कर्मचारी व पोलीस बांधवांच्या भोजनाची व्यवस्था सुद्धा न्यासाकडून केली जाते. पोलिओ लसीकरणाचे वेळेस शहरातील कार्यरत असणाऱ्या



पत्रकारांच्या पाल्यानां श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून शालेय साहित्याचे किट वाटप प्रसंगी

कर्मचाऱ्यांना भोजन व्यवस्था केली जाते. शासनाचे विविध उपक्रमास हे न्यास सर्वोतोपरी सहकार्य करते.

राज्य परिवहन मंडळाच्या बाहेर गावाहून मुक्कामी येणाऱ्या सुमारे ४० ते ४८ बसेसच्या चालक व वाहकांना सुद्धा अद्ययावत असे विश्रांती कक्ष व वाहनतळ न्यासाकडून या परिसरामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे.

आतापर्यंत प्रति महिन्याची पौर्णिमा व मंडळास साजरा केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उत्सवा प्रसंगी २०१४ पासून सुमारे २०,००० पेक्षाही जास्त राक्तदात्यांकडून रक्त संकलन केले आणि खऱ्या अर्थाने रक्तदानाची चळवळ अक्कलकोट तालुक्यात रुजविली. तसेच स्वामी भक्तांसाठी अद्ययावत वैद्यकीय सुविधांनी युक्त अँब्युलन्स सेवा आणि फायर ब्रिगेड ची व्यवस्था उपलब्ध आहे. दिव्यांग व वृद्ध लोकांना अन्नछत्र परीसरात ने आण करण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गी व व्हीलचेअरची सोय केली आहे.

हे धर्मादाय न्यास शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमास नेहमी भरीव सहकार्य करीत असते. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक, क्रिडाविषयक व सांस्कृतिक उपक्रम सदैव राबवित असते. स्त्रिभृण हत्या, हुंडाबळी, महिला आरोग्य, वृक्षे लावा व जगवा, जल साक्षरता अभियान, स्वच्छता अभियान इ. कार्याच्या माध्यमातून हे न्यास सदैव अग्रेसर आहे.

वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन या महत् कार्यात सोलापूर-अक्कलकोट रस्त्याच्या दुतर्फा, वडाची झाडे लावून त्याचे जतन आणि संवर्धन करण्यात आले. शहरातील चौकाचे सुशोभीकरण केले आहे. फत्तेसिंह मैदानावर बसण्यासाठी सुमारे ५० नग सिमेंट बाकडे बसविले असून वृक्षारोपण व संवर्धन करून नगरपालिकेच्या विकास कार्यात मोठे योगदान देऊ केले आहे. अक्कलकोट शहराच्या विकासामध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने मोलाची भूमिका बजावलेली आहे. न्यासाच्या १९८८ पासून अविरत सेवेमुळे अक्कलकोट शहरातील व लगतच्या भागातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध झालेला आहे. अन्नछत्राच्या



राजे फत्तेसिंह क्रिंडागंणावर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते वृक्षारोपण करीत असताना.

चौकात पोलीस चौकी, तहसील कार्यालय आणि ग्रामीण रुग्णालय, या ठिकाणी कायमस्वरूपी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून पुणे येथील कलावंताना मे २०२१ मध्ये मदत म्हणून सुमारे ३०० अन्नधान्य किटचे वाटप केले आहे. याच दरम्यान, अक्कलकोट येथील ग्रामीण भागात तसेच सोलापूर येथील गरजवंताना १२०० अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. कोविडच्या आणि लॉकडाऊन च्या काळात, अक्कलकोट शहरामध्ये दररोज सुमारे १००० गरीब लोकांना तीन महिने जेवण वाटप केले. एकूण ५२ दिवसात ५१,५०० लोकांना अन्नवाटप केले आहे. शहरात व ग्रामीण भागात सॅनिटायझर ची फवारणी वेळोवेळी केली.

यात्रीनिवास या निवासी इमारतीमध्ये शासनाचे कोविड सेंटर सुरू केले. तेथील पॉझिटिव्ह रुग्णांना दररोज चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण देण्याचे कार्य केले आहे. कोव्हिड सेंटरला स्थानिक प्रशासनाच्या मागणीनुसार ५० बेड, ५० गाद्या, ५० उशा व बेडशिटस देत व्यवस्था करण्यात आली तसेच ससून हॉस्पिटल पुणे येथे व्हेंटीलेटर देऊ केले आहे.

यत्र नार्यस्तू पुज्यंते रमंते तत्र देवता, या उक्तीला सार्थ करत, स्त्री शक्ती प्रति आदर व्यक्त करण्यासाठी हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून हे न्यास उल्लेखनीय कार्य करीत आहे. हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था हे अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असून, ही संस्था सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, नवरात्री मध्ये तुळजाभवानी मंदिरात हजारो महिलांसमवेत कुंकुमअर्चन, गणेशोत्सवात हजारो महिलांसमवेत गणेश अथर्वशिर्ष पठण इ. उपक्रम राबवित सखी महिलांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या संस्थेच्या अध्यक्षा- मा.सौ. अलकाताई जनमेजयराजे भोसले ह्या असून संस्थापक सचिवा- मा.सौ. अर्पिताराजे अमोलराजे भोसले ह्या आहेत.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष सन्मा.श्री.जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली, दत्तजयंती २०२१ पासून 'समर्थ महाप्रसाद सेवा' सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, अक्कलकोट शहरातील दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या जवळपास २६० गरीब, गरजवंत व निराधार लोकांना दैनंदिन दोन वेळेचे जेवण, डब्यातून घरपोच करण्याचे कार्य, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामार्फत करण्यात येत आहे.

२०२१ मध्ये अन्नछत्रात अध्यक्षांचे कार्यालयालगत वटवृक्षाखाली असलेल्या जुन्या दत्त मंदिराची काळ्या पाषाणात उभारणी केली असून आतील सुंदर व देखणी दत्तमूर्ती जयपूरहून आणून स्थापित केली आहे.

अन्नछत्राच्या पूर्वेस समर्थ वाटिकेजवळ, कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या काळ्या पाषाणाच्या मंदिराचे बांधकाम केले असुन प्रति तुळजाभवानी मंदिर उभारण्यात आले आहे. २०२४ पासून भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध झाले आहे.

ऑक्टोंबर २०२३ पासून सोलापूरच्या बी.सी. गर्ल्स हॉस्टेल मधील अनाथ १५० मुलींच्या भोजनासाठी दरमहा अन्नधान्य व खाद्यतेल पुरवठा केला जातो. जानेवारी २०२४ पासून तालुक्यातील ८६ कुस्तीगीरांना दरमहा तूप, खारीक, बदाम, अक्रोड इत्यादींचे खुराक वाटप सुरू केले आहे.

न्यासाने जगभरातील स्वामी भक्तांच्या सोयीसाठी मंडळात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती www.swamiannachatra.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे. न्यासास देणगी देणाऱ्या देणगीदारास आयकरात ८० ची कलमान्वये सवलत आहे. तसेच परदेशात स्थित स्वामीभक्तांना अन्नछत्राच्या स्वामी कार्यासाठी न्यासाच्या वेबसाईटवर जाऊन ऋऊठ ह्या अकाऊंटला देणगी देता येते.

स्वामी भक्तांचे सोयीसाठी आणि ऑनलाइन देणगी देणे सहज सुलभ व्हावे यासाठी न्यासाने क्यू आर कोड प्रणाली सुद्धा विकसित केलेली आहे. सद्या सन्मा.श्री अमोलराजे जनमेजयराजे भोसले हे या धर्मादाय न्यासाचे 'कार्यकारी अध्यक्ष' पदी असून ते सक्षमपणे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे हित आणि स्वामीभक्तांना स्वामीरुपात केंद्रस्थानी मानून कार्य करीत आहेत. त्यांनी अन्नछत्राच्या विकासास चालना दिली आहे, तसेच नियोजित महाप्रसादगृह इमारत बांधकामास गती प्राप्त करून दिली आहे. श्री स्वामी समर्थांची आध्यात्मिक महती, त्यांचं कार्य, हे इतकं ओजस्वी आहे की, त्यांचे अनुयायी, भक्तगण यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे आणि भविष्यातही ही संख्या वाढतच राहणार. ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन, सध्याच्या जुन्या महाप्रसाद गृहालगतच्या वाहनतळशेड, याठिकाणी भव्य नियोजित महाप्रसाद गृह साकारण्यात येणार असून नवीन तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेला, अभ्यासपूर्ण आराखडा अन्नछत्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आला आहे.

एक दृष्टिक्षेप- नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर नियोजित ५ मजली महाप्रसादगृहाची इमारत ही भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित् असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल.


या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम नोव्हेंबर २०२४ पासून सुरु झाले असुन ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६५ कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि या नियोजित भव्य ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सदर नियोजित भव्य अशा ५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे भूमिपूजन दि.२१-७-२०२४, रोजी तत्कालीन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व सद्याचे मुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे हस्ते संपन्न झाले आहे. श्री स्वामी समर्थांची कृपादृष्टी, स्वामी भक्तांचा स्वामींच्या रुपात मिळणारा आशीर्वाद आणि अन्नछत्रात अहोरात्र व अविरत परिश्रम करणारे, निस्वार्थी वृत्तीने सेवा करणारे असंख्य सेवेकरी व कार्यकर्ते त्यांचे परिश्रम व विनम्रता यावरच अन्नछत्राची शून्यातून निर्मिती होऊन इवल्याशा रोपव्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. अन्नदानाच्या धर्मकार्यास वाहून घेतलेले स्वामी रूपातील असंख्य देणगीदार आणि तरुण उत्साही व नम्र कार्यकर्ते आणि निस्वार्थीपणे सेवा करणारे सेवेकरी हेच या न्यासाच्या यशाचे गमक आहे.





MEDICAL
SPORT





युटोपियन शुगर्स लि.
पंतनगर, कचरेवाडी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर.
UTOPIAN
SUGARS LTD.
कर्मयोगी
श्रद्धेय कै. सुधाकरपंत परिचारक
दैनिक
तरुण भारत
च्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!




सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
श्री. हरिकांतजी(नाना) सरवदे
माजी सभापती, स्थायी समिती,
सोलापूर महानगरपालिका
सौजन्य
नानासाहेब प्रतिष्ठान
जोशी गल्ली, सोलापूर




प्रसाद शा. कुलकर्णी
मो. 9822378098
समर्थ
केटरर्स
✻ अन्नपूर्णा पुरस्कार
अ.भा.मराठी परिषद, मुंबई
✻ व्यवसाय सेवा पुरस्कार
रोटरी क्लब ऑफ सोलापूर ईस्ट
✻ अन्नपूर्णा पुरस्कार
शाहीर पठ्ठे बापुराव प्रतिष्ठान, पुणे
तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
४७३, द. कसबा गणराज, दत्त चौक, सोलापूर मो. ९४२०४८८६५७
samarthcaters@gmailc.com www.samarthcaterersolapur.in




दै.तरुण भारत
वर्धापन दिनाच्या
हार्दिक
शुभेच्छा..
महादेव आवाळे
प्रदेश सचिव - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
शरदचंद्र पवार, महाराष्ट्र राज्य




सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
प्रा.काकासाहेब कुलकर्णी
प्रवक्ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी




तरुण भारत
दैनिक सोलापूर
तरुण भारतच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!
ॲड.धनंजय माने
बी.एस.सी.एलएल.बी
मो.९८२२२८२९२५
ॲड.जयदीप माने
बी.एस.एल.एलएल.बी
मो.९४२२५३२७५४
९८२२५३२७५४
कार्यालय : चेंबर नं. ७ लॉयर्स चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार,
सोलापूर ४१३००३
निवास : माने सदन, २११, नवीपेठ, सोलापूर ४१३००७




दैनिक सोलापूर तरूण भारत
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा!
तरुण भारत
शुभेच्छुक
सो. स. क्षत्रिय समाज (विठ्ठल मंदिर) ट्रस्ट, संचालित
सहस्त्रार्जुन शैक्षणिक
संकुल, सोलापूर
(प्राथमिक, माध्यमिक व इंग्रजी माध्यम विभाग)




तरुण भारत
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
एक
हितचिंतक




तरुण भारत
दैनिक सोलापूर तरुण
भारतच्या वर्धापन दिनास
हार्दिक
शुभेच्छा!
व्यंकटराव पाटील
चेअरमन व जिल्हा बँक
संचालक
मा. श्री. उमेश मोरे
व्हा. चेअरमन
मा.श्री.प्रदीप कुंभार
गट सचिव
विना सहकार नाही उद्धार! सहकारातून समृद्धीकडे!
संचालक मंडळ : कल्याणराव बिरादार (ज्येष्ठ संचालक), विजयकुमार कावळे,
भरत महाके, बाबासाहेब माने, जयपाल माने, गणेश पाटील, शहाजी कांबळे, राजाबाई पाटील,
सिंधूबाई पाटील, सद्विवेक मिरकले, संजीव हुले.
शुभेच्छुक : विविध कार्यकारी सेवा सोसायटी, दैठणा, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर




दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
छत्रपती संभाजी महाराज नागरी
सहकारी पतसंस्था मर्या.,सोलापूर.
३३० पूर्व मंगळवार पेठ, दक्षिणमुखी मारुती मंदिरासमोर,
कुंभार वेस, सोलापूर. संपर्क : 8329279227
।। ध्यास आर्थिक समृद्धीचा ।।
व्दितीय वर्धापन दिनानिमित्त
ठेवीवर ११%
सातत्याने
यशस्वीतेकडे
वाटचाल
व्याजदर
✻ ऑफर फक्त ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत
अधिक माहितीसाठी संपर्क : 8329279227